पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८८ ■ सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# घंटागाडीचा डर्टी टॅक्स डोक्यावर...

## घरगुती आणि व्यावसायिक कचरा संकलनासाठी मोजावे लागणार पैसे

प्रतिनिधी २७ एप्रिल

**अकोला:** अकोलेकरांची लुट करण्यासाठी महापालिकेतील सत्तारुढ शहर सुधार आघाडीने घंटागाडीचा डर्टी टॅक्स वसुल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा समावेश मालमत्ता करात करत बंद घर, रिकामे प्लॉट आणि रहिवासी नसलेल्या भागातून या घंटागाडीचा डर्टी टॅक्स वसुल होणार आहे.

**अकोलेकरांची नवी लुट**

मालमत्ता करासोबत अकोलेकर विशेष स्वच्छता कर आणि मलजल कर हे आधीच देत आहे. कचरा घंटागाडी चालकांच्या उदरनिर्वाहासाठी सुरु केलेले तीस रुपये प्रति घर, पन्नास रुपये प्रति दूकान संकलन निधी आता थेट घंटागाडीचा डर्टी टॅक्स झाला आहे. दरमाह तीस रुपये घरगुती कचरा संकलनाचे पन्नास रुपये केले गेले.

### व्यापारी, व्यावसायिकांची लुट

दरमहा आकारले जाणारे शुल्कानुसार निवासी प्रत्येक घरासाठी दरमहा ५० रुपये शुल्क आकारले जाईल. अर्थात वार्षिक सहाशे रुपये आता टॅक्स मध्ये अर्थात मालमत्ता करात लावले जाणार आहे. तर किरकोळ दुकाने आणि क्लिनिकसाठी दरमाह ६० रुपये शुल्क निश्चित केले आहे. म्हणजे वार्षिक ७२० रुपये द्यावे लागणार आहे. तरऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स शोरूम आणि गोदामांसाठी दरमाह १२० रुपये मोजावे लागतील. अर्थात वार्षिक १४४० रुपये द्यावे लागणार आहे. साध्या उपहारगृहांसाठी ११४० रुपये वार्षिक, तर राहण्याची व जेवणाची सोय असलेल्या हॉटेल्ससाठी १९२० रुपये शुल्क द्यावे लागेल. ५० खाटांपेक्षा कमी असलेल्या रुग्णालयांसाठी १४४० रुपये वार्षिक आणि ५० पेक्षा जास्त खाटा असलेल्या रुग्णालयांसाठी २१६०रुपये वार्षिक शुल्क आकारले जाईल. शाळा, वसतिगृहे, धार्मिक संस्था आणि सरकारी कार्यालयांसाठी १०८० रुपये वार्षिक शुल्क लागू करण्यात आले आहे. चित्रपटगृहे, मॉल आणि मंगल कार्यालयांसाठी शुल्काचे प्रमाण सर्वाधिक आहे. एका पडद्याच्या चित्रपटगृहांसाठी आणि विवाह कार्यालयांसाठी दरमहा १००० रुपये म्हणजे वार्षिक बारा हजार रुपये. तर शॉपिंग मॉल्स आणि मल्टिप्लेक्ससाठी १८ हजार रुपये वार्षिक शुल्क द्यावे लागणार आहे. फेरीवाल्यांसाठी दरमहा १५० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

# शिक्षणाधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

## अकोला जिल्हा परिषदेतील अंधेर नगरी उघड !

प्रतिनिधी २७ एप्रिल

**अकोला:** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करत असताना, अकोला जिल्हा परिषदेतील संबंधित अधिकारी मात्र आपली 'हुकूमशाही' गाजवण्यात मग्न आहेत. प्रशासनाच्या एका चुकीच्या निर्णयामुळे किंवा अधिकाऱ्यांच्या आडमुठेपणामुळे एका निष्पाप विद्यार्थ्याचे शैक्षणिक भवितव्य अंधारात सापडले आहे.

काजळेश्वर (ता. बार्शिटाकाळी) येथील रहिवासी चंद्रवीर अभिमान तेलगोटे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या तक्रारीतून एक धक्कादायक वास्तव समोर आले आहे. त्यांचा भाचा, मिलिंद श्रीकांत गवई (वय ७ वर्ष) याची निवड आर टी ई अंतर्गत झाली होती. नियमानुसार सर्व कागदपत्रे आणि नोंदणीकृत भाडेकरार ऑफिसमध्ये जमा करण्यात आले. मात्र, तिथे बसलेल्या महिला अधिकाऱ्याने 'समितीने मंजुरी दिली तरी मी मान्य करणार नाही' अशी उर्मट भूमिका घेतल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. तक्रारदाराने पत्रात स्पष्टपणे विचारले आहे की, जर समितीने कागदपत्रे मंजूर केली असतील, तर ही 'मॅडम' स्वतःला समितीपेक्षा मोठी समजते का ? सामान्य जनतेला मदत करण्याऐवजी त्यांना वेठीस धरणे हा या अधिकाऱ्यांचा नवा धंदा झाला आहे का ? 'आणखी एक चूक, आणखी एक विद्यार्थी उद्ध्वस्त' हेच या विभागाचे ब्रीदवाक्य झाले आहे की काय, असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

### आता थेट 'आमरण उपोषणाचा' इशारा!

या मनमानी कारभाराविरुद्ध आता आरपारची लढाई सुरू झाली आहे. चंद्रवीर तेलगोटे यांनी इशारा दिला आहे. या भ्रष्ट आणि अडवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी व्हावी. मागील १० वर्षांतील आर टी ई प्रवेशांची संपूर्ण माहिती (विद्यार्थ्यांचे नाव, पत्ता, शाळा) जाहीर करावी. जर न्याय मिळाला नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'आमरण उपोषण' केले जाईल आणि न्यायालयात याचिका दाखल केली जाईल.

## प्रहार जनशक्ती पक्ष शिवसेनेत विलीन होणार ?

प्रतिनिधी २७ एप्रिल

**मुंबई :** शिवसेनेकडून विधान परिषदेसाठी नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू यांची नावं आघाडीवर आहेत. मात्र या दोघांच्या नावावर शिंदेंचे मंत्री आणि नेत्यांनीच विरोध दर्शवला आहे. राज्यसभेप्रमाणे नवीन चेहऱ्याला संधी द्यावी, असा अनेकांचा सूर आहे. तसेच बच्चू कडू यांचा शिवसेनेशी काय संबंध? असाही पक्षातील नेत्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. उमेदवारी द्यायची झाल्यास बच्चू कडू यांच्यासमोर शिवसेनेने एक अट ठेवल्याची सूत्रांची माहिती आहे.

# बाजारवसुलीची निविदा झाली रद्द !

## आर आर सी च्या न्यूजचे भाकित खरे ठरले...!



प्रतिनिधी २७ एप्रिल

अकोला महानगरपालिकेच्या बाजार वसुली निविदा प्रक्रियेत अखेर तोच संशयास्पद निर्णय झाला, ज्याचे भाकीत सभेपुर्वी आर आर सी न्यूज ने आधीच वर्तवले होते. सरकारी तिजोरीला कोट्यवधींचा महसूल मिळवून देणारी प्रक्रिया केवळ एका विशिष्ट राजकीय कार्यकर्त्याच्या स्वार्थासाठी स्थायी समितीने गुंडाळली आहे. या निविदा प्रक्रियेत कंत्राटदारांनी १.३५ कोटींच्या ऑफसेट प्राईजपेक्षाही जास्त बोली लावली होती, तरीही ती रद्द करण्यात आली. विशेष म्हणजे, ३० मार्च रोजी तयार झालेली टिपणी तब्बल एक महिना नेमकी कोणाकडे पेंडिंग होती, असा सवाल आता उपस्थित होत आहे. आता मनपाच्या ८ कर्मचाऱ्यांच्या ऐवजी २० कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेत नवी निविदा तीन महिन्यात काढण्याचा आदेश सभापतींनी दिला.

महापालिका स्वतः अवघ्या ८० लाखांची वसुली करत असताना, कंत्राटदाराकडून दीड कोटींची अपेक्षा ठेवणे हा निव्वळ विरोधाभास आहे. ६ वेळा निविदा काढूनही यश आले नाही आणि आता ७ व्यांदा प्रक्रिया पूर्ण होताना ती रद्द केली जात असल्याने प्रशासनाच्या हेतूवर संशय व्यक्त होत आहे. जास्त महसूल देणाऱ्यांना डावलून फेरनिविदेचा घाट घालणे म्हणजे प्रशासकीय अधिकारांचा दुरुपयोग आणि जनतेच्या पैशांचे नुकसान आहे. आता ८ ऐवजी २० कर्मचारी नियुक्त करण्याचे आदेश सभापतींनी दिले आहे. राजकीय दबावामुळे महापालिकेच्या नियमावलीचा अक्षरशः खेळखंडोबा सुरू असून अकोलेकर आता या भ्रष्ट कारभाराविरुद्ध जाब विचारत आहेत. तरी या गोंधळामागे कोणाचे 'आर्थिक' हित दडलेले आहे, हे स्पष्टपणे दिसत आहे.

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या बाजार वसुली निविदा प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप होत असल्याची चर्चा शहरात सुरू झाली आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी जास्त रकमेची बोली लावणारा कंत्राटदार समोर आला असतानाही, केवळ एका विशिष्ट भाजप कार्यकर्त्याची सोय करण्यासाठी हे टेंडर सातव्यांदा रद्द करण्यात आले.

अकोला शहरातील जनता बाजार, जुना भाजी बाजार, लोहा बाजार आणि शिवचरण पेठ यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमधील दैनिक परवाना फी वसुलीसाठी महापालिकेने ई-निविदा (क्र. ०१) प्रसिद्ध केली होती. यासाठी १ कोटी ३५ लाख रुपये इतकी 'ऑफसेट प्राईज' (किमान रक्कम) निश्चित करण्यात आली होती. ३० मार्च २०२६ रोजी उघडण्यात आलेल्या निविदेमध्ये तीन कंत्राटदारांनी सहभाग घेतला होता. यात वीरा गारमेंट (प्रो. महादेव पठ्ठे ) यांनी ३.७८ टक्के अधिकचे टेंडर टाकत १,४०,११,११० रुपये महापालिकेला देऊ केले आहे. पठ्ठे यांना टेंडर मिळू नये म्हणून ते आज रद्द झाल्याची चर्चा रंगली आहे. या टेंडर प्रक्रियेत सूर्यदेव महेंद्र पांडे यांनी १,३८,९०,६९० रुपये चे टेंडर मुल्यापेक्षा २.८९ टक्के जास्त टाकत दूसऱ्या क्रमांकाचे स्थान पटकावले. तर तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या चेतन संजय झाडोकर यांनी महापालिकेला १,३५,७५,६०० रुपये देण्याचे कबुल करत केवळ ०.५६टक्के रक्कम ऑफसेट प्राईज पेक्षा अधिक देण्याचे मान्य केले. पण, नियमानुसार, सर्वात जास्त बोली लावणाऱ्या 'वीरा गारमेंट'ला हे काम मिळणे अपेक्षित होते आणि तसा प्रस्ताव उपायुक्तांनी स्थायी समितीकडे पाठवला होता. तब्बल एक महिन्या या प्रस्तावर चर्चा का थांबली असा ही प्रश्न उपस्थित होत आहे. आज हे टेंडर स्थायी समितीत झालेल्या चर्चेअंती रद्द करण्यात आले. शासकीय तिजोरीत ऑफसेट प्राईजपेक्षा जास्त पैसे जमा होत असताना, अधिक रक्कम देणाऱ्या कंत्राटदाराला बाजूला सारून फेरनिविदा काढणे म्हणजे महापालिकेचे आर्थिक नुकसान करण्यासारखे आहे. एका भाजप कार्यकर्त्याला या प्रक्रियेत सामावून घेता यावे, यासाठीच हा सर्व खटाटोप सुरू असल्याची चर्चा आता महापालिका वर्तुळात रंगली आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# उन्हाळ्यातील मेळघाट : रापलेल्या रानाची हिरवी गोष्ट

महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतश्रेणीत वसलेला 'मेळघाट' म्हणजे निसर्गाचे एक अनोखे लेणे. 'मेळघाट' या शब्दाचा अर्थच 'घाटांचा मेळ' असा होतो. पावसाळ्यात धबधबे आणि दाट हिरवाईने नटलेला हा प्रदेश उन्हाळ्यात मात्र पूर्णपणे वेगळे रूप धारण करतो. अनेकांना असे वाटते की उन्हाळ्यात मेळघाटला जाणे म्हणजे केवळ उष्णतेचा सामना करणे, पण निसर्गप्रेमी आणि वन्यजीव अभ्यासकांसाठी उन्हाळ्यातील मेळघाट हा एक 'सुवर्णकाळ' असतो.

**बदलते निसर्ग रूप: पिवळसर तांबूस रान**

मार्च महिना सुरू झाला की मेळघाटातील पानगळीच्या वृक्षांचे रूप पालटायला लागते. पावसाळ्यातील तो गडद हिरवा रंग विरून जातो आणि संपूर्ण जंगलावर पिवळसर, तांबूस रंगाची चादर पसरते. सागवान, धावडा, सालई आणि मोहाच्या झाडांची पाने गळून पडतात. जमिनीवर वाळलेल्या पानांचा खसखस आवाज येत असतो. हे दृश्य पाहताना असे वाटते की जणू सृष्टीने जुन्या वस्त्रांचा त्याग करून नवीन चैतन्याची प्रतीक्षा सुरू केली आहे.

उन्हाळ्याच्या दुपारच्या वेळी मेळघाटातील शांतता भारावून टाकणारी असते. मधूनच ऐकू येणारा होले किंवा कोकिळेचा आवाज या शांततेला छेद देतो. मात्र, याच काळात मेळघाटातील 'पळस' आणि 'पांगारा' फुलायला लागतात. उन्हाच्या कडाक्यात जेव्हा रान होरपळत असते, तेव्हा केशरी रंगाच्या पळसफुलांनी (ज्याला 'फ्लेम ऑफ द फॉरेस्ट' म्हणतात) नटलेला हा डोंगर एखाद्या अग्नीज्वाळेसारखा तेजस्वी दिसतो.

**वन्यजीव दर्शनाची सर्वोत्तम संधी**

व्याघ्र प्रकल्पाच्या दृष्टीने उन्हाळा हा मेळघाटातील पर्यटनाचा 'पीक सीजन' मानला जातो. त्याचे मुख्य कारण म्हणजे पाणी.

**पाणवठ्यांवरील गर्दी:** उन्हाळ्यात नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटतात. त्यामुळे वाघ, बिबट्या, अस्वल आणि गवे (Iåian Bison) यांना कृत्रिम पाणवठ्यांवर किंवा उरलेल्या जलकुंभांकडे यावेच लागते. तासनतास एखाद्या पाणवठ्याजवळ दबा धरून बसल्यावर वन्यजीवांचे दर्शन होण्याचे प्रमाण उन्हाळ्यात सर्वाधिक असते.

**निसर्गाची पारदर्शकता:** पानगळ झाल्यामुळे जंगल विरळ होते. पावसाळ्यात



झाडाझुडपांच्या आड लपलेले प्राणी उन्हाळ्यात सहज नजरेस पडतात. वाळलेल्या पानांचा आवाज प्राण्यांच्या हालचालींची चाहूल आधीच देतो.

**दुर्मिळ पक्षी:** मेळघाट हे पक्षीप्रेमींसाठी नंदनवन आहे. उन्हाळ्यात 'फॉरेस्ट ओउलेट' (रानपिंगळा) यांसारख्या अत्यंत दुर्मिळ पक्षांचे निरीक्षण करणे सोपे जाते.

**आदिवासी संस्कृती आणि मोहाचा दरवळ**

मेळघाटचा उल्लेख तिथल्या कोरकू आणि गोंड आदिवासी बांधवांशिवाय अपूर्ण आहे. उन्हाळा हा त्यांच्यासाठी अत्यंत कष्टाचा पण उत्सवाचा काळ असतो. मार्च-एप्रिलमध्ये मेळघाटातील हवेत 'मोहाच्या फुलांचा' एक विशिष्ट गोड सुगंध दरवळत असतो. आदिवासी बांधव पहाटेपासूनच मोहाची फुले वेचण्यासाठी रानात जातात. ही फुले त्यांच्या उपजीविकेचे एक मुख्य साधन आहेत.

याच काळात 'होळी' किंवा 'फाग' हा सण मेळघाटात मोठ्या उत्साहात साजरा होतो. ढोलाच्या तालावर चालणारे त्यांचे पारंपरिक नृत्य आणि निसर्गाशी असलेले त्यांचे अतूट नाते उन्हाळ्याच्या दिवसांत जवळून अनुभवता येते.

**पर्यटकांची सोय आणि आव्हाने**

मेळघाटात चिखलदरा, सेमिडोह, हरिसाल आणि धारणी ही प्रमुख पर्यटन स्थळे आहेत. चिखलदरा हे विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण असल्याने, मेळघाटातील उष्णतेपासून थोडा दिलासा मिळवण्यासाठी पर्यटक येथे गर्दी करतात.

**सफारीची मजा:** सेमिडोह किंवा कोलकास येथून होणारी जंगल सफारी उन्हाळ्याच्या सकाळ-संध्याकाळच्या वेळी अत्यंत सुखद असते. ताजी हवा आणि जंगलाचा सुगंध मनाला उभारी देतो.

**उष्णतेचा कडाका:** दुपारच्या वेळी मेळघाटातील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर जाऊ शकते. त्यामुळे सोबत भरपूर पाणी, सुती कपडे आणि डोक्यावर टोपी असणे अनिवार्य आहे.

**जंगल वाचवण्याची गरज: वणवा**

उन्हाळ्यातील मेळघाट समोर एक मोठे संकट असते, ते म्हणजे 'वणवा'. वाळलेला पालापाचोळा आणि कडक ऊन यामुळे जंगलात आग लागण्याची शक्यता असते. कधी नैसर्गिक कारणाने तर कधी मानवी चुकीमुळे ही आग लागते. मेळघाटचे वनविभाग कर्मचारी रात्रंदिवस या वणव्यापासून जंगलाचे संरक्षण करण्यासाठी झटत असतात. एक सजग पर्यटक म्हणून उन्हाळ्यात जंगलात फिरताना काडीपेटी किंवा ज्वलनशील वस्तू न वापरणे हे आपले कर्तव्य आहे.

उन्हाळ्यातील मेळघाट हा केवळ 'उन्हाचा तडाखा' नाही, तर तो निसर्गाच्या 'अस्तित्वाचा संघर्ष' आणि 'धैर्य' दर्शवणारा काळ आहे. पाणी कमी असूनही डौलाने उभे असलेले सागवान, रानाला आग लावणारा पळस आणि पाणवठ्यावर तहान भागवणारा वाघ... हे सर्व अनुभवण्यासाठी एकदा तरी उन्हाळ्यात मेळघाटची वारी करायलाच हवी.

मेळघाटचे हे रापलेले रूप आपल्याला शिकवते की, कठीण काळातही आपले सौंदर्य आणि अस्तित्व कसे टिकवून ठेवायचे. पावसाळ्यातील मेळघाट जर 'रंगीत चित्रपट' असेल, तर उन्हाळ्यातील मेळघाट हे त्या निसर्गाचे 'काळे-पांढरे पण वास्तववादी शिल्प' आहे.


# श्रीनिवासन रामानुजन : गणितज्ञांमधील ईश्वरीय विभूती !

काल २६ एप्रिल या दिवशी थोर भारतीय गणितज्ञ श्रीनिवासन रामानुजन यांची पुण्यतिथी झाली. त्या निमित्ताने...

सर्जनशीलता, म्हणजे नवीन आणि उपयुक्त कल्पना निर्माण करण्याची क्षमता होय. वैज्ञानिक सर्जनशीलता म्हणजे नवीन शोध लावणे. विज्ञान शाखांमध्ये विश्वमान्य कर्तृत्व करून दाखवणाऱ्या व्यक्तीमत्त्वांनी केलेल्या नवनिर्मिती मागील त्यांच्या सर्जनशीलतेचे रहस्य अवश्य समजून घ्यायला हवे. याचे कारण त्यांचे संशोधनच तितके विस्मयकारक असते.

भारतीय संस्कृती, हिंदु धर्म आणि अध्यात्म हे वैज्ञानिक प्रगतीतील अडथळा आहेत, म्हणून आजच्या काळात 'टाकाऊ' असे अनेकांना वाटत रहाते. मग संगणक नवीन आणला, तर त्याची पूजा कशाला इथपासून 'इस्रो'चे शास्त्रज्ञ तिरुपतीला यानाचे छोटे प्रतिरूप त्याला प्रत्यक्ष अवकाशात पाठवण्याआधी का नेतात ? आणि तेथे देवासमोर ठेवतात इथपर्यंत टीका चालू असते. या मंडळींना हिंदु धर्म आणि विज्ञान हे दोन्ही विषय दोन ध्रुवांइतके दूर वाटतात. जे काही थोडे हिंदु धर्माचे काही अनुकरण करत असतात, त्यांना ते फारतर संस्कृतीरक्षण आणि मनःशांती यांसाठी महत्त्वाचे वाटते. विज्ञानाच्या वाटेवर चालायचे, तर त्यात अनुसरत असलेल्या धर्माचा काही उपयोग आहे, याची त्यांना जाण नसते. काहींना असली, तर ती जणू काही चमत्कार असल्याप्रमाणे काही तरी असेल, असे कदाचित् वाटत असते. या सगळ्यांना वैज्ञानिक सर्जनशीलतेच्या जोपासनेसाठी हिंदु धर्म-अध्यात्म अत्यंत पूरक आहे, हे लक्षात येत नाही. त्यांना मग ही वैज्ञानिक सर्जनशीलतेची झेप क्षितीजापार जाण्यासाठी ते आवश्यक आहे, हे लक्षात येणे शक्यच नाही. त्यामुळे हिंदु धर्म-तत्त्वज्ञान-अध्यात्म आणि वैज्ञानिक सर्जनशीलता या दोन्हींची विलक्षण सांगड असलेले उदाहरण म्हणून गणितज्ञ श्रीनिवासन रामानुजन यांचे चरित्र अभ्यासनीय ठरते.

'रामानुजन यांची धार्मिक-आध्यात्मिक वैशिष्ट्येच त्यांच्या अद्भुत गणित संशोधनासाठी पुष्कळ महत्त्वाची ठरली. जर कदाचित् तसे कुणाला वाटले नाही, तरी किमान ती पूरक कशी ठरली, हे पाहून विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संशोधक यांना त्यातून काही लाभ होईल', या उद्देशाने हा लेख आहे. विस्तारभयास्तव लेखातील सूत्रांची मांडणी वर उल्लेखित उद्देशासंबंधी काही दृष्टी मिळावी इतपत मर्यादित असणार आहे. यांत रामानुजन यांचे संक्षिप्त चरित्र, त्यांचा करण्यात आलेला गौरव, त्यांच्या गणिती प्रतिभेची वैशिष्ट्ये, त्यांची धार्मिकता आणि त्यांच्या सर्जनशीलतेत त्यांची



धार्मिकता अन् आध्यात्मिकता यांचा वाटा याविषयी आपण पहाणार आहोत.

२२ डिसेंबर १८८७ मध्ये कुंभकोणम्, तमिळनाडू येथे एका गरीब कुटुंबात रामानुजन यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव श्रीनिवासन रामानुजन अय्यंगार. गणितात पैकीच्या पैकी गुण मिळवून मॅट्रिक परीक्षेत जिल्ह्यात प्रथम आलेल्या रामानुजनला महाविद्यालयात गेल्यावर गणित वगळता अन्य कोणत्याही विषयात रुचीच उरली नव्हती. स्वाभाविक त्यांचे ते शिक्षण प्रथम वर्षातच थांबले. तोपर्यंत त्यांचा विवाह झाला होता. उदरनिर्वाहासाठी मद्रास पोर्टमध्ये कारकुनाची नोकरी कशीबशी मिळवावी लागली. लहानपणापासून एकहाती चालू असलेला गणिताचा व्यासंग, तसेच संशोधन मात्र कोणत्याही अडचणी आल्या, तरी थांबले नाही. हे संशोधन त्यांनी वर्ष १९१३ मध्ये इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापिठातील प्रा. जी.एच्. हार्डी यांना 'पडताळा आणि योग्य वाटल्यास प्रसिद्ध करा', असे सांगत पाठवले. हे संशोधन पाहून प्रभावित होऊन हार्डी यांनी महत्प्रयासाने त्यांना इंग्लंडमध्ये आणले. वर्ष १९१९ मध्ये शारीरिक अस्वास्थ्यामुळे रामानुजन यांना भारतात परतणे भाग पडले. त्यांचे वर्ष १९२० मध्ये आजारामुळे निधन झाले.

ब्रिटिशांनी केवळ त्यांचे संशोधन पाहून त्यांना प्रथम 'बी.ए.' (कला शाखेची पदवी) नंतर फेब्रुवारी १९१८ मध्ये 'एफ्.आर्.एस्. (फेलो ऑफ रॉयल सोसायटी)' ही पदवी दिली. शास्त्रज्ञ म्हणून हा गौरव प्राप्त होणारा हा पहिला भारतीय आणि मोजक्या तरुणांपैकी एक ! जेम्स न्यूमन, गणितज्ञ : गणिताची प्राचीन परंपरा असणाऱ्या पोर्वात्य जगताच्या इतिहासातील सर्वाधिक प्रतिभाशाली गणितज्ञ !

क्लिफोर्ड स्टोल : भौतिकशास्त्रात जे स्थान न्यूटनचे, संगीतात जे स्थान मोजार्टचे, तेच गणितातील स्थान रामानुजनचे आहे. ज्युलियन हक्सले : २० व्या शतकातील सर्वश्रेष्ठ गणितज्ञ !

अनेक भारतीय, तसेच विदेशी लेखकांनी पुस्तकरूपाने, लेखरूपाने त्यांचे चरित्र लिहून त्यांना समजून घेण्याचा आणि जगाला सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यावर भारतात 'रामानुजन' (वर्ष २०१४), तर हॉलीवूडमध्ये 'द मॅन हू न्यू इन्फिनिटी' (वर्ष २०१५) हे चित्रपट प्रदर्शित करण्यात आले आहेत. ज्याचे ना कुणी राजकीय पाठीराखे आहेत, ना कुणी अन्य कसल्याही प्रकारे वारस आहेत, अशा अल्पायुशी भारतियासंबंधी चरित्र चित्रपट हॉलीवूडने काढावा, हे विशेष नाही का ? येत्या वर्षांत आणखी एक चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

रामानुजन यांच्या गणिती प्रतिभेची काही उदाहरणे

गणिताची ज्यांना माहिती आहे, काही विशेष अभ्यास आहे, त्यांना रामानुजन यांच्या गणितातील प्रतिभेविषयी माहिती असेलच; परंतु ज्यांना त्यांच्या गणिती प्रतिभेविषयी काहीच माहिती नसेल, त्यांच्यासाठी तिची चुणूक दाखवणारी मोजकी सोपी उदाहरणे देत आहे.

रामानुजन यांची गणिती प्रतिभा शाळेत जाण्याआधीपासूनच प्रकट होऊ लागली होती; परंतु शाळेत गेल्यानंतर ती ठळक झाली. प्राथमिक शालेय जीवन : प्राथमिक शाळेत असतांना गणिताच्या शिक्षकांनी वर्गात अंश आणि छेद एकच असेल, तर उत्तर कायम एक येते, हे शिकवले. उदा. ३ आंबे आहेत आणि ३ जणांना वाटायचे आहेत, तर ३ भागिले ३, म्हणजे १ म्हणून प्रत्येकाला एक आंबा मिळेल, असे सांगितले. लगेच रामानुजनने उठून विचारले, 'म्हणजे शून्याला शून्याने भागले काय होईल ? एक आंबा मिळेल काय ?'

इयत्ता ५ वीमध्ये असतांना श्रीनिवास दूरवर दिसणारे ताऱ्यांकडे एकाग्रतेने पहात असे आणि शिक्षकांना पृथ्वीपासून ताऱ्यांचे अंतर, त्यांचा आकार, दोन ताऱ्यांतील अंतर अशा प्रकारचे प्रश्न विचारत असे.

रामानुजनच्या शाळेत १५०० विद्यार्थी होते आणि ३० शिक्षक होते. मुख्याध्यापकांनी शाळेतील गणिताच्या ज्येष्ठ शिक्षकांना शिक्षकांचे तास आणि विद्यार्थ्यांचे वर्ग यांचे योग्य वेळापत्रक करायला सांगितले. ते त्यांना करता येत नव्हते. त्यांनी श्रीनिवासला सांगितले. त्याने ते चुटकीसरशी करून दिले.

गणितामध्ये श्रीनिवासला १०० पैकी १०० गुण मिळत. त्याची गणिती कुशलता पाहून 'बी.ए.'चे विद्यार्थी त्याच्याकडे गणित शिकवणीसाठी येत. त्यांची पुस्तके घेऊन श्रीनिवासने एकहाती स्वतःचा अभ्यास पुढे नेला. गणिताचे प्राध्यापक फळ्यावर अनेक पायऱ्या (टप्पे) लिहून एखादे प्रमेय शिकवत असत. मध्येच रामानुजनला प्रश्न विचारत. रामानुजन मग त्यातील पायऱ्या अनावश्यक असल्याचे सांगून थेट उत्तर मांडत असे.

डॉ. दुर्गेश सावंत
गोवा

## दिनविशेष

# जागतिक डिझाईन दिन




दरवर्षी २७ एप्रिल रोजी जागतिक डिझाईन दिन साजरा केला जातो. हा दिवस सर्जनशीलता, नाविन्य आणि समाज घडवण्यात डिझाइनच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित आहे. 'इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ डिझाइन' (घ्पदअ) द्वारे १९६३ मध्ये स्थापन झालेला हा दिवस, मानवी जीवन आणि संस्कृतीवर डिझाइनच्या प्रभावावर प्रकाश टाकतो.

जागतिक डिझाईन दिनाचा मुख्य उद्देश डिझाइनच्या सामर्थ्याला अधोरेखित करणे आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे आहे. १९६३ मध्ये आयसीओडी (International Council of Design) या संस्थेने या दिनाची सुरुवात केली. हा दिवस डिझाइन व्यावसायिकांना एकत्र आणतो आणि डिझाइनच्या सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय प्रभावावर चर्चा करतो.

२०२६ ची थीम ठद स्पेसेस इन बिटवीनठ (ऊप एर्ज्मे घ्ह ग्रौह) ही संकल्पना आहे, जी कल्पना आणि अनुभव यांच्यातील जागा शोधते.

साजरा करण्याची पद्धत मुख्यत्वे डिझाइन प्रदर्शने, कार्यशाळा आणि स्पर्धा आयोजित करून हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस केवळ सौंदर्यशास्त्र नाही, तर 'जगण्याची कला' म्हणून डिझाइनकडे पाहण्याचा दृष्टिकोन देतो.

जागतिक डिझाईन दिनाच्या संदर्भात विचार केला तर पुरातन आणि आधुनिक काळाशी विविध डिझाइन ने आपल्या जीवनात रंग भरलेला दिसतो. कपडे असोत किंवा दागदागिने, अंतर्गत सजावट तसेच जीवनाशी निगडित विविध बाबी. ज्यांचा सौंदर्याशी संबंध आहे. कारण ही रेंज खूप मोठी आहे आणि आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या एकूण वाटचालीत हवे तसे डिझाइन काही क्षणात उपलब्ध होत आहेत. आपले आयुष्य बदलून गेले आहे.

# रविभाऊ राणा यांचा वाढदिवस समर्पणाची जाणीव करून देणारा



बडनेरा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार, युवा स्वाभिमान पार्टीचे संस्थापक आणि जनसामान्यांचा खरा आवाज म्हणून ओळखले जाणारे श्री. रविभाऊ राणा यांचा जन्मदिवस हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा आणि समाजाप्रती त्यांच्या समर्पणाची जाणीव करून देणारा एक विशेष दिवस आहे. श्री. रविभाऊ राणा हे केवळ राजकारणी नाहीत, तर ते एक 'मास लीडर' म्हणून जनतेच्या मनात घर करून आहेत. सामान्य माणसांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे, हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे.

'जनसेवा आणि जनविकास' हेच त्यांचे ध्येय असून, या ध्येयासाठी त्यांनी आयुष्य वाहून घेतले आहे. बडनेरा मतदारसंघातून सलग चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून येणे, हे त्यांच्या कामावर असलेल्या जनतेच्या विश्वासाचे द्योतक आहे. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी राबवलेली विविध कामे—पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रातील उपक्रम—यामुळे बडनेराचा चेहरामोहरा बदलत आहे.

युवा स्वाभिमान पार्टीच्या माध्यमातून त्यांनी युवकांना नवी दिशा दिली आहे. युवकांच्या समस्या, रोजगार, कौशल्य विकास या मुद्द्यांवर त्यांनी ठोस भूमिका घेतली आहे. त्यामुळेच ङ्गयुवकांचा आधारङ्ग म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ झाली आहे. त्याचप्रमाणे, समाजातील वयोवृद्धांसाठीही ते नेहमीच आधारस्तंभ ठरले आहेत. स्त्रीदाक्षिण्य जपणारे, स्त्रियांचा मनापासून आदर करणारे आणि माय-भगिनींचे लाडके भाऊ म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कृतीतून त्यांनी नेहमीच स्त्री-पुरुष समानतेचा विचार पुढे नेला असून, स्त्रियांना समान संधी मिळाव्यात यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. त्यांच्या या विचारसरणीमुळे अनेक महिलांना सार्वजनिक जीवनात येण्याची प्रेरणा मिळाली आहे. याच प्रेरणेचा परिणाम म्हणून आज मी स्वतः नगरसेवक म्हणून माझ्या प्रभागाचे प्रतिनिधित्व करत आहे. राजकारणात पाऊल टाकण्याची प्रेरणा मला त्यांच्या कार्यातूनच मिळाली. तसेच आज अमरावती महानगरपालिकेची शिक्षण सभापती म्हणून जबाबदारी भाऊंनी माझ्यावर देऊन स्त्रियांच्या बुद्धीवरील विश्वास व्यक्त केलेला आहे आणि तो विश्वास सार्थकी लावण्याची जबाबदारी माझी आहे, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. तसेच कोणतीही आपत्ती असो, नैसर्गिक संकट असो आरोग्यविषयक अडचणी किंवा इतर सामाजिक समस्या, अशा वेळी श्री. रविभाऊ यांनी नेहमीच पुढाकार घेत जनतेला मदतीचा हात दिला आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीमुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल आदर आणि विश्वास अधिक दृढ झाला आहे. रविभाऊ राणा यांचे नेतृत्व हे धाडसी, स्पष्टवक्ते आणि जनतेशी नाळ जुळवून ठेवणारे आहे. कोणत्याही प्रश्नावर ठाम भूमिका घेऊन तो प्रश्न मार्गी लावण्याची त्यांची कार्यशैली त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा, यासाठी ते सदैव कटिबद्ध आहेत. श्री. रविभाऊ राणा हे जनतेशी थेट संवाद आणि उपलब्धता ही श्री. रविभाऊ राणा यांची एक मोठी ताकद म्हणजे त्यांचा जनतेशी असलेला थेट संवाद. मतदारसंघातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या ऐकणे आणि तत्काळ त्यावर उपाययोजना करणे, ही त्यांची कार्यपद्धती आहे. त्यामुळेच ते ङ्गजनसामान्यांचा खरा आवाजङ्ग म्हणून ओळखले जातात. आज त्यांच्या जन्मदिवसानिमित्त, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देताना, त्यांनी हाती घेतलेले जनसेवा व जनविकासाचे कार्य अधिक वेगाने आणि यशस्वीपणे पुढे जावे, हीच अपेक्षा.

श्री. रविभाऊ राणा यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



ॲड. प्रीती बनारसे -रेवणे
शिक्षण सभापती मनपा,
नगरसेवक प्रभाग क्रमांक १२
अमरावती

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला**
**ई-निविदा सुचना ०२/२०२६-२०२७**
**जावक क्रमांक २४९७/ ईनिसु-०२/निलि/ २०२६ / दिनांक-०६.०४.२०२६**
email.akola.ee@mahapwd.gov.in Phone No: 0724-2435195

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला** या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता **ब-१** नमुन्यातील **काम क्र. १ ते ३** निविदा प्रणालीव्दारे **(ऑनलाईन मागविण्यात येत आहे)** निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार तसेच अंतरराष्ट्रीय कंपनी यांची उपकंपनी भारतीय असल्यास निविदे स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकेल. निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकातील. कंत्राटदारांकडून **ब-१** नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. **ई-निविदा संकेत स्थळ** https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | अकोला जिल्ह्यातील अकोला तालुक्यातील एनएच ते म्हैसपूर प्रजिमा-२८ कि.मी. ०/०० ते ३/५०० पर्यंत रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करणे (रा.म.मा. १६१ एक कान्हेरीपासून साहित पर्यंत) | ३९०,००,००० |
| २ | अकोला जिल्ह्यातील अकोला तालुक्यातील म्हैसांग रामगांव दहिगाव गावंडे अन्वी मिर्झापूर बोरगाव मंजू रस्ता प्रजिमा-१२ कि.मी. ३/०० ते ४/०० व ४/५०० ते ६/०० मध्ये सुधारणा करणे व संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे ३/८०० (रा.म. २८० म्हैसांगपासून रामगांव आणि रा.म. २८४ कासमपूर पासून रा.म.मा. ५३ बोरगांवपर्यंत) | २३०,००,००० |
| ३ | अकोला जिल्ह्यातील अकोला तालुक्यातील अकोला आपातापा म्हैसांग रस्ता रा.मा. २८० कि.मी. ७/२०० मध्ये पूलाचे बांधकाम करणे. (अकोला पासून म्हैसांग पर्यंत आणि लाखपूरी पासून बल्लारखेड पर्यंत आणि कवठा खोलापूर आसरापर्यंत आणि भातकुली पासून अमरावती कुऱ्हा पुलागांव पर्यंत रामा २८०) | १९७,००,००० |

**अटी व शर्ती-**

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
२. ई-निविदा काम **क्र. १ ते ३** कामांची ई-निविदा **दिनांक २७.०४.२०२६** रोजी १०.०० पासून दिनांक ०४.०५.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई-निविदा कामांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक ०६.०५.२०२६ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे)
३. वरील काम क्र. १ कामांची निविदा **पूर्व बैठक दिनांक २८.०४.२०२६ रोजी वेळ १२.०० वाजता मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती येथे** आयोजित करण्यात येईल.
४. वरील काम क्र. **२ ते ३** कामाची निविदा **पूर्व बैठक दिनांक २८/०४/२०२६ वेळ १२.०० वा. मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे आयोजित करण्यात येईल.**
५. वरील काम क्र.०१ ते ०३ कामाची ई-निविदा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे उघडण्यात येतील.
६. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in
७. ईतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
८. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही.
९. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
कार्यकारी अभियंता
सा.बा. विभाग, अकोला

आरओसी-२०२६-२७/क्र.-५/C422

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## आलेगाव परिसरात उष्णतेचा कहर

**आलेगाव :** पातूर तालुक्यातील आलेगाव येथे आज प्रचंड उष्णतेचा कहर पाहायला मिळत असून नागरिक हैराण झाले आहेत. सकाळपासूनच तापमानात मोठी वाढ झाल्याने दुपारपर्यंत उकाडा असह्य झाला. आज किमान तापमान ३१.४ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान तब्बल ४२ ते ४३ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार दिवसभर आकाश पूर्णपणे निरभ्र राहिले असून पावसाची कोणतीही शक्यता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परिणामी सूर्याचा तडाखा अधिक तीव्र जाणवत आहे. त्यातच आर्द्रतेचे प्रमाण केवळ ८ज्ञ् ते १६ज्ञ् दरम्यान असल्याने वातावरणात कोरडेपणा वाढला आहे. वाऱ्याचा वेग सुमारे ८ कि.मी./तास इतका कमी असल्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून कोणताही दिलासा मिळत नाही. दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसून आला, तर अत्यावश्यक कामांशिवाय नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत.

## महानगरात आचार्य सुधांशुजी महाराज यांच्या उल्हास पर्वाचे आयोजन



**अकोला:** लाखो भक्तांचे तारणहार प.पु. आचार्य सुधांशूजी महाराज यांचा वाढ दिवस उल्हास पर्वाच्या रूपात दरवर्षी साजरा करण्यात येतो.या निमित्ताने विश्व जागृती मिशन अकोला मंडळाच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. उत्सव दिनाचा प्रारंभ शुक्रवार दि १ मे रोजी होणार आहे.या दिनी सकाळी ९ वाजता नवीन बस स्टँड परिसरात नागरिकांना थंड शरबत वितरित करण्यात येणार आहे.शनिवार दि. २ मे रोजी सायं.६ वाजता टेलिकॉम कॉलोनी,रिंगरोड येथील आनंद निकेतन सत्संग भवनात भव्य उल्हास पर्व साजरे करण्यात येणार आहे.या दिनी सकाळी ८ वाजता महामृत्युंजय जप व होमहवन होणार आहे.सायंकाळी ६ वाजता भजन कार्यक्रम होणार आहे.रात्री ७ वाजता ग्रामगीताचार्य व राष्ट्रीय कीर्तनकार हभप श्रीकृष्ण महाराज सावळे गुरुजी यांचे कीर्तन होणार आहे.रात्री ८-३० वाजता सामूहिक आरती होऊन या उत्सवाचे समापन होणार आहे.


# डंपिंग ग्राउंडमधील जळत्या कचऱ्याचा धूर

प्रतिनिधी २७ एप्रिल

### ◆ राष्ट्रीय महामार्ग ५ ३ बनला मृत्यूचा मार्ग!

**मुर्तिजापूर:** २४ एप्रिलच्या रात्री सुमारे ९:०० वाजल्यापासून उशिरापर्यंत मुर्तिजापूर येथील डंपिंग ग्राउंडमध्ये जळालेल्या कचऱ्यामुळे निर्माण झालेल्या दाट धुराने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ (Nh-53) पूर्णपणे आपल्या विळख्यात घेतला. धुराचे प्रमाण इतके जास्त होते की, महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांना रस्ता स्पष्ट दिसत नव्हता. त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, डंपिंग ग्राउंडमध्ये अचानक आग लागल्यानंतर त्याचा धूर जोरदार वाऱ्यासह थेट राष्ट्रीय महामार्गावर पसरला. चारचाकी वाहनांसह इतर वाहनचालकांना जीव धोक्यात घालून अत्यंत सावधगिरीने आणि कमी वेगाने या मार्गावरून



प्रवास करावा लागला. अनेक वाहनचालकांनी सांगितले की, काही अंतरापर्यंत समोर काहीच दिसत नव्हते, त्यामुळे अपघाताची पूर्ण शक्यता निर्माण झाली होती.

जुनी वस्तीपर्यंत पोहोचला विषारी धूर; काही वेळसाठी नागरिकांच्या आरोग्यावर संकट बनला होता.

चिंतेची बाब म्हणजे डंपिंग ग्राउंडच्या अगदी जवळच निवासी जुनी वस्ती आहे. या भागातील घरांपर्यंत विषारी धूर मोठ्या प्रमाणात पोहोचल्याने लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. अनेकांना श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ अशा समस्यांना सामोरे आल्याने

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. व प्रशासनावर प्रश्नचिन्ह; कचऱ्याच्या ढिगला आग लावली तरी कोणी? सर्वात मोठा प्रश्न असा उपस्थित होत आहे की, डंपिंग ग्राउंडमधील कचऱ्याला आग नेमकी कोणी लावली? ही निष्काळजीपणा होता की जाणीवपूर्वक कचरा जाळण्यात आला? जर या धुरामुळे मोठा अपघात झाला असता, तर त्याची जबाबदारी कोण घेतली असती?

डंपिंग ग्राउंडची जबाबदारी ज्या संबंधित व्यक्तींवर सोपविण्यात आली आहे, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

डंपिंग ग्राउंडची नियमित देखरेख, कचऱ्याच्या वैज्ञानिक विल्हेवाटीची व्यवस्था आणि महामार्ग व वस्ती परिसरात अशा प्रकारची निष्काळजीपणा पुन्हा होऊ नये, यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

## तेल्हारा तालुक्यातील घोडेगाव येथे दत्तगुरु प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी २७एप्रिल

**तेल्हारा:** तालुक्यातील घोडेगाव येथे दिनांक २४ एप्रिल पासून दत्तगुरु प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याची सुरुवात आणि सांगता गुरुवर्य श्री वासुदेव भारती महाराज यांच्या शुभ हस्ते होणार असून, गुरुवर्य रमणपुरीजी महाराज निरंजन यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या धार्मिक कार्यक्रमात श्री प्रभुदास पा. वकटे तसेच श्री हरीराम पा. डिक्कर हे व्यासपीठावरून प्रवचन व निजात्मबोध या ग्रंथाचे पठण करणार आहेत. दिनांक २४ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत हा दिव्य सोहळा पार पडत असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमादरम्यान ढोल भजन, नामस्मरण, दत्तगुरुचा गजर तसेच प्रवचनकारांच्या वाणीतून दत्त महिमेचे वर्णन होत असून पंचक्रोशीतील भजन मंडळे उत्साहाने सहभागी होत आहेत. तसेच उपस्थित भाविकांसाठी दररोज भोजन व फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे. दिनांक २९ एप्रिलपर्यंत नित्य सोळा उपचार पूजा सुरू आहे. हा मंगलमय सोहळा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत असून, भक्तिभावाने परिसर दुमदुमून गेला आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री रमेशराव ताथोड, श्री बाळू भाऊ ढोले, श्री राजु प्रकाश ढोले, श्री अनंता गु. ढोले, श्री सतीष वा. ढोले, श्री सुभाष ज्ञा. ढोले, श्री अनंता श्री. ढोले, श्री अनिल के. ढोले, श्री अरुण स. ढोले, श्री प्रतीक र. पखान तसेच सर्व मार्गस्थ मंडळी घोडेगाव यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच श्री दिनकर पहुरकार, श्री गजाननराव गोठकडे, श्री श्रीराम पं. डेरे, श्री विठ्ठल दा. ढोले, श्री अक्षय ढोले, श्री उमेश ग. ढोले आणि श्री विठ्ठल म. ढोले यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

## बोर्डी नदीवर कोल्हापुरी बंधारा व पुलाचे काम सुरू

प्रतिनिधी २७ एप्रिल

**अकोट:** मौजे वडाळी देशमुख येथील रंभापुर रस्त्यावरील शेतकऱ्याच्या शेतीच्या शेती कामासाठी अति उपयुक्त मुख्य रस्ता तसेच श्री दत्तप्रभू संस्थान व भाविकांना दर्शनासाठी जाण्यावर येण्याकरिता अगदी महत्त्वाचा हा रस्ता असून बोर्डी नदीवर शिव मंदिरापासून या मुख्य रस्त्याचे व कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन दादा पुंडकर यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आला.

२५ रोजी त्याचे भूमिपूजन करण्यात आले. त्या प्रसंगी उपस्थित सरपंच प्रवीण शिंगाडे



उपसरपंच प्रमोद शेषराव खलोकार, रामदास हुसे, विलास खलोकार, रवींद्र घाटोळ, राजेश हुसे, शामभाऊ खलोकार, विजय मुळे, विठ्ठल काळे,शंकर लोखंडे,शरद शेगोकार, पंजाब बोरोडे, गणेश फुकट, विशाल मुळे, गजानन पटके,विजय खलोकार, चक्रधर फुलारी, उमेश वरोकार, मोहन खलोकर, सिद्धार्थ खंडारे, प्रमोद खलोकार, व ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थितीत श्रीफळ फोडून पूजन करण्यात आले व सर्वांना पेढे वाटप करण्यात आले लघु पाटबंधारे विभाग पदाधिकारी उपस्थिती लावून होते या कोल्हापुरी बंधाऱ्यामुळे सर्व शेतकऱ्यांना सिंचनाला पाणी साठवण होईल व शेतीसाठी या पाण्याचा जल स्तोत्र वाढेल भविष्यात बोरवेल्स विहिरींना पाण्यामध्ये वाढ होईल व शेतीसाठी पाणी मिळेल असा विश्वास व्यक्त होत आहे.

## निधन वार्ता

### आशाबाई पाटील



**अकोला:** जिल्हा व सत्र न्यायालयाचे माजी रजिस्ट्रार सुनील पाटील यांची आई आशाबाई विश्वास पाटील ८५, यांचे २६ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

### डॉ. नारायण बिडकर



**अकोला:** कुंभारीचे माजी उपसरपंच तथा जय बजरंग मंडळाचे सहसचिव डॉ. नारायण बिडकर यांचे २६ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा २७ एप्रिलला दुपारी ४ वाजता निघणार आहे.

### सचिन रायबोले



**अकोट :** बोर्डी येथील भूमिहीन शेतमजूर सचिन विश्वनाथ रायबोले ३४ यांचे २६ ला दुपारी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील व तीन बहिणी आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# अकोटमध्ये खासगी शाळांच्या शुल्कवाढीचा प्रश्न ऐरणीवर

राजेश सोळंके २७ एप्रिल

### ◆ पालकांवर वाढता आर्थिक ताण

**अकोट:** अकोट शहर व तालुक्यातील खासगी शाळांकडून आकारण्यात येणाऱ्या वाढीव शुल्कामुळे पालकांचा आर्थिक ताण दिवसेंदिवस तीव्र होत आहे. नर्सरी व पूर्व प्राथमिक वर्गांसाठीच २० ते ३० हजारांपर्यंत शुल्क आकारले जात असल्याचे समोर येत असून, काही नामांकित शाळांमध्ये ही रक्कम लाखांच्या घरात पोहोचत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे सामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शिक्षण हे मूलभूत हक्क असताना ङ्खशिक्षणासाठी पैसा झाला मोठाङ्क ही भावना पालकांमध्ये अधिकच तीव्र होत आहे. वाढत्या खर्चामुळे कुटुंबांच्या भविष्यातील नियोजनावरही परिणाम होत असून, ही परिस्थिती पालकांच्या आर्थिक स्थैर्यावर घाला घालत असल्याचे जाणकारांचे मत आहे.

याशिवाय, शाळांकडून पुस्तके, गणवेश व इतर शालेय साहित्य विशिष्ट दुकानांमधूनच खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी पालकांकडून होत आहेत. त्यामुळे स्पर्धात्मक दरांचा पर्याय बंद होऊन खर्चात आणखी वाढ होत आहे.

दरम्यान, खासगी व स्वयंअर्थसहायित शाळांच्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने शुल्क विनियमन कायदा लागू केला आहे. या अंतर्गत विभागीय शुल्क नियामक समित्या व पुनरीक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. नियमांनुसार १५ टक्क्यांपेक्षा अधिक शुल्कवाढ करणाऱ्या किंवा मनमानी पद्धतीने फी आकारणाऱ्या शाळांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

शासनाच्या अधिसूचनेनुसार राज्य व विभागीय स्तरावर समित्यांची स्थापना करून संबंधित अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना तक्रार नोंदविण्यासाठी अधिकृत मार्ग उपलब्ध झाला आहे. पालकांना त्यांच्या तक्रारी या समित्यांकडे तसेच तालुका व जिल्हा शिक्षण विभागाकडे सादर करता येणार आहेत.

यासोबतच सर्व खासगी शाळांना या समित्यांची माहिती व संपर्क तपशील शाळेच्या सूचना फलकावर दर्शविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करण्यावरही भर देण्यात येत आहे. या संबंधी गट शिक्षण अधिकाऱ्याची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

> दरवर्षी फी वाढते, पण उत्पन्न तितक्याच वेगाने वाढत नाही. मुलांच्या शिक्षणासाठी तडजोड करावी लागते.
>
> **- एक पालक**

> शासनाने नियम केले असले तरी त्याची अंमलबजावणी कठोरपणे होणे आवश्यक आहे. अन्यथा मनमानी सुरूच राहील.
>
> **- पालक प्रतिनिधी**

> **तेरी भी चूप मेरी भी चूप!**
>
> शाळांकडून प्रवेश प्रक्रियेदरम्यान पालकांना मुलांच्या उज्ज्वल भवितव्याची आकर्षक स्वप्ने दाखवली जातात. 'आमचीच शाळा सर्वोत्तम' असा विश्वास निर्माण करत प्रवेश घेतला जातो. आर्थिकदृष्ट्या सक्षम पालक गुपचूप प्रवेश घेत असले, तरी मध्यमवर्गीय कुटुंबांची मात्र मोठी कोंडी होते.

## जीएमसी मधील बेघर रुग्णाची ओळख पटविण्याचे आवाहन

प्रतिनिधी २७एप्रिल

**अकोला:** १४ एप्रिल पासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील सर्जरी विभाग अंतर्गत वार्ड क्रमांक १२ मध्ये एक बेघर वयोवृद्ध रुग्ण गोविंद ढवळे वय ७२ वर्ष चिखली येथील पत्ता सांगत आहे.

सदर रुग्णाला मातोश्री वृद्धाश्रम शिवापूर येथून उपचारासाठी उश्ण् अकोला येथे भरती केले होते. सध्या रुग्णाची तब्येत चांगली झाली आहे व उपचारपण पूर्ण झालेले आहेत आणि रुग्ण डिस्चार्ज साठी रेडी आहे असे डॉक्टरांनी सांगितले. परंतु अद्याप त्यांचे नातेवाईक रुग्णाची ओळख पटवण्यासाठी आणि घरी नेण्यासाठी पुढे आलेले



नाहीत. सदर रुग्णाची कोणालाही ओळख पटल्यास किंवा नातेवाईक असल्यास त्यांनी सर्वोपचार रुग्णालयाचे समाजसेवा अधीक्षक लक्ष्मीकांत शिंगोटे (मोबाईल क्रमांक ८३८०८३०१८२) यांच्याशी किंवा वार्ड १२ मध्ये संपर्क करावा.

अधिष्ठाता डॉ.संजय सोनुने यांच्या मार्गदर्शनात, वैद्यकीय अधीक्षक डॉ.श्यामकुमार सिरसाम यांच्या देखरेखीत सर्जरी विभाग प्रमुख डॉ.अरविंद आडे आणि डॉ.राजेश चिंचोलकर, डॉ.अवनीश देशमुख, डॉ.अभिजीत बंकुवाले, डॉ.सिदार्थ सिंग बघेल, डॉ.पसूला प्रणितकुमार यांनी रुग्णावर उपचार केला आहे. वार्ड परिसेविका सुनीता सैतवाल, वंदना मोरे, शिल्पा शिरसाट, नम्रता गोमासे, किरण श्रीराव, प्रीती आगरे, रेश्मा शेख, रक्षा जाधव, सुशील मेट तसेच कक्षसेवका विश्रांती कांबळे, सफाई कामगार बबलू दावत रुग्णाची काळजी घेत आहेत. अनोळखी रुग्णाचे नातेवाईक पुढे आल्यावर पुनर्वसन, मदत व समन्वय करण्याचे कामकाज समाजसेवा अधीक्षक लक्ष्मीकांत शिंगोटे करतील.

## माहेश्वरी महिला संगठनाचा पदग्रहण सोहळा उत्साहात

प्रतिनिधी २७एप्रिल

**अकोला :** सामाजिक सेवेत सक्रिय असणाऱ्या अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संगठनाचे पदग्रहण समारोह मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अकोट येथील सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये विदर्भ प्रादेशिक माहेश्वरी महिला संघटने अंतर्गत अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संगठनाच्या दहाव्या सत्राचे पदग्रहण झाले. २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी अध्यक्षपदावर शारदा नवनीत लखोटिया (अकोट) यांचा निवड झाली. सचिवपदी आरती पुरुषोत्तम पनपालिया, कोषाध्यक्षपदी रेखा प्रमोद चांडक यांची नियुक्ती झाली. याशिवाय उपाध्यक्ष प्रेमा मुंदडा, संगीता हरकंठ, तारा सदानी, शोभा भट्टड, सहसचिव ममता मालानी, लीला मालपाणी, कृष्णा चांडक, कविता राठी, संघटना मंत्री विजयश्री जाजू, सहकोषाध्यक्ष सुनिता राठी, राजश्री सोमानी, प्रचार मंत्री पूनम मुंदडा इत्यादी कामकाज सांभाळणार आहेत.

# अकोटमध्ये आदर्श विवाहाची एक सुंदर परंपरा!

प्रतिनिधी २७ एप्रिल

### ◆ छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीने सुरू झालेला मंगलमय सोहळा.....!

**अकोट:** अकोट येथे पार पडलेल्या मृणाल गणेशनाथ पाठक आणि किमया मंगेशनाथ पवार यांच्या विवाहसोहळ्याने एक अनोखी आणि प्रेरणादायी परंपरा समाजासमोर उभी केली. अकोट येथे झालेल्या या विवाहात केवळ दोन जीवांचे मिलनच नव्हते, तर संस्कार, श्रद्धा आणि आदर्शांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

या मंगल प्रसंगी वधू-वरांनी विवाहातील मंगलाष्टक सुरू होण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांची आरती करून आपल्या वैवाहिक जीवनाची सुरुवात केली. परंपरेसोबत राष्ट्रभक्ती आणि संस्कारांचा असा संगम पाहून उपस्थित मान्यवर आणि नातेवाईक भावूक




झाले.

आजच्या आधुनिक काळात विवाह सोहळे केवळ दिखाव्यापुरते मर्यादित राहतात, मात्र या दाम्पत्याने आपल्या कृतीतून समाजाला एक वेगळा संदेश दिला,

संस्कार आणि इतिहासाची जपणूक करतच नवीन जीवनाची सुरुवात करावी.

या अनोख्या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये अभिमानाची भावना जागृत झाली. अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा परंपरांचा प्रसार समाजात व्हावा, अशी भावना व्यक्त केली.

हा विवाह सोहळा केवळ आनंदाचा नव्हता, तर तो एक प्रेरणा देणारा क्षण ठरला. छत्रपतींच्या आशीर्वादाने सुरू झालेल्या या नवदांपत्याच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि यश नांदो, अशा शुभेच्छा सर्वांनी दिल्या.

संस्कार, श्रद्धा आणि आदर्श यांचा संगम घडवणारा हा विवाह समाजासाठी खरोखरच एक प्रेरणादायी दीपस्तंभ ठरला आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
**माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# पुसद तालुक्यात कृषी सेवा केंद्र बंद; विक्रेत्यांचे बेमुदत आंदोलन सुरु

प्रतिनिधी २७ एप्रिल




**पुसद :** राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या प्रलंबित अडचणींवर तातडीने निर्णय घ्यावा, या मागणीसाठी पुसद तालुक्यासह राज्यभरातील कृषी सेवा केंद्र चालकांनी सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद आंदोलन सुरू केले आहे. यामुळे पुसद तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रे बंद ठेवण्यात आली असून विविध ठिकाणी निषेध आंदोलन करण्यात आले.

यवतमाळ जिल्हा कृषी साहित्य उत्पादक व विक्रेता असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली तसेच पुसद तालुका कृषी साहित्य विक्रेता संघाच्या नेतृत्वात हे आंदोलन छेडण्यात आले आहे. संघटनेचे अध्यक्ष सुधीर पळसकर व उपाध्यक्ष संजय नाईक, सचिव नितेश शेजपाल यांनी ही माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

गेल्या ४ ते ५ वर्षांपासून बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके विक्री व्यवसायातील विविध अडचणींबाबत राज्याच्या कृषी विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असतानाही कोणताही ठोस निर्णय घेतला गेला नाही, असा आरोप विक्रेत्यांनी केला आहे. त्यामुळे अखेर बेमुदत बंद आंदोलनाचा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

विक्रेत्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये खतांच्या पुरवठ्यातील 'लिंकिंग' पद्धत बंद करणे, अप्रमाणित HTBT कपाशी बियाण्यांवर बंदी, सॅम्पल फेल झाल्यास विक्रेत्यांना आरोपी न धरता साक्षीदार मान्यता देणे, तपासणी अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबतची अधिसूचना रद्द करणे, खत वितरणात सुधारणा, विक्री मार्जिन वाढविणे, प्रलंबित देयके अदा करणे, मुदतबाह्य कीटकनाशके कंपन्यांनी परत घेणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

तसेच, अवैध व निकृष्ट दर्जाच्या कृषी निविष्ठांवर नियंत्रण आणणे, नवीन बियाणे व कीटकनाशके कायद्यातील जाचक अटी शिथिल करणे आणि हवामान बदलामुळे फळपिकांच्या नुकसानीसाठी विक्रेत्यांना जबाबदार धरू नये, अशाही मागण्या करण्यात आल्या आहेत.

राज्याच्या कृषी विभागाकडून या मागण्यांवर सकारात्मक व तातडीने निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. तसेच, हे आंदोलन शेतकऱ्यांच्या हितासाठी असून खत पुरवठ्यातील अडचणी दूर करण्यासाठी व निकृष्ट बियाण्यांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठीच हा निर्णय घेतल्याचे विक्रेत्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, तालुक्यात विविध ठिकाणी निषेध आंदोलन करण्यात आले असून या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष सुधीर पळसकर, उपाध्यक्ष संजय नाईक तसेच इतर पदाधिकारी, कंपनी प्रतिनिधी, शेतकरी व विक्रेते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ४६ अंशात उपजिल्हा रुग्णालयातच 'उकाडा'

## रुग्णांची होरपळ; पाणी, कुलर आणि वीज व्यवस्थेचा अभाव

प्रतिनिधी २७ एप्रिल



**उमरखेड :** उमरखेड शहरासह यवतमाळ जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट सुरू असून तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी शासन प्रयत्न करत असताना उमरखेड येथील उपजिल्हा रुग्णालयातील ढिसाळ कारभार उघडकीस आला आहे.

तालुक्यातील विविध भागांतून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना रुग्णालयात मूलभूत सुविधांचाच अभाव जाणवत आहे. प्रचंड उकाडा असतानाही रुग्णालयात कुलरची व्यवस्था नाही.

वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर इन्व्हर्टरची सोय नसल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना त्रास सहन करावा लागत आहे.

तसेच, पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था नसल्याने रुग्ण व नातेवाईकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

बाहेरच्या उष्णतेपासून दिलासा मिळावा म्हणून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना आतही उकाड्याचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

### आंदोलनाचा इशारा

■ उपजिल्हा रुग्णालयातील गैरसोयींबाबत अनेकदा तक्रारी करूनही सुधारणा झालेली नाही. रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शहर प्रमुख राहुल मोहितवार यांनी दिला आहे.

# उमरखेड तालुक्यात उष्णतेची लाट

प्रतिनिधी २७ एप्रिल

**तापमान ४२ अंशांवर, जनजीवन विस्कळीत**

**उमरखेड :** तालुक्यात उष्णतेची तीव्र लाट दिवसेंदिवस वाढत असून कमाल तापमानाने ४२ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. ढगाळ वातावरण असतानाही उकाडा कायम असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. अंगाची लाहीलाही करणाऱ्या कडक उन्हामुळे ग्रामीण भागातील शेतीकामे सकाळी ११ वाजेपूर्वीच आटोपली जात असून दुपारनंतर सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

शहरातही वाढत्या तापमानाचा परिणाम स्पष्ट जाणवत आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवरील वर्दळ लक्षणीयरीत्या कमी झाली असून अनेकजण घरातच थांबणे पसंत करत आहेत. आधीच 'हॉटस्पॉट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उमरखेड तालुक्यात यंदाच्या उन्हाळ्याच्या सुरुवातीपासूनच तापमानात सातत्याने वाढ होत आहे. २४ एप्रिल रोजी तापमान ४२ अंशांच्या पुढे गेल्याची नोंद झाली होती.

दरम्यान, पुढील काही दिवसांत तापमान आणखी वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### सावलीचा प्रश्न ऐरणीवर

■ तापमानाचा पारा चढत असल्याने नागरिक सावलीच्या शोधात भटकताना दिसत आहेत. वाटसरू झाडांची सावली मिळेल त्या ठिकाणी थांबण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, रस्ते विकासाच्या कामांदरम्यान मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणात झाडांची तोड करण्यात आली. त्यानंतर वृक्षलागवड व त्यांची योग्य जोपासना करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने सावलीचा प्रश्न गंभीर बनला आहे. भविष्यात रस्ते सावलीमय करण्यासाठी वृक्षलागवडीसह संवर्धनावर भर देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# २८,८७७ विद्यार्थ्यांनी दिली शिष्यवृत्ती परीक्षा ; २,५२९ जणांची दांडी

प्रतिनिधी २७ एप्रिल

**यवतमाळ :** चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यात रविवारी विद्यार्थ्यांची मोठी धडपड पाहायला मिळाली. कडक उन्हाचा तडाखा असतानाही एकूण २८ हजार ८७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर २ हजार ५२९ विद्यार्थ्यांनी गैरहजेरी लावली. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी जिल्ह्यातील २,४९४ शाळांमधून ३० हजार ७६४ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. त्यापैकी चौथीचे १७ हजार ४८३ व सातवीचे १३ हजार २८१ विद्यार्थी नोंदणीकृत होते.

जिल्ह्यात चौथीसाठी १५१ व सातवीसाठी ११४, अशी एकूण २६५ परीक्षा केंद्रे उभारण्यात आली होती. सकाळी ११ ते १२.३० या वेळेत भाषा व गणिताचा पहिला पेपर पार पडला. त्यानंतर दुपारी २ ते ३.३० या वेळेत इंग्रजी व बुद्धिमत्ता चाचणीचा दुसरा पेपर घेण्यात आला. उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी सकाळीच केंद्रांवर हजेरी लावल्याने परीक्षेची प्रक्रिया सुरळीत पार पडली. परीक्षेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुखांनी विविध केंद्रांना भेट देत पाहणी केली. दरम्यान, चौथीच्या १,०३३ व सातवीच्या ८९६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली नाही. त्यामुळे एकूण गैरहजरांची संख्या २,५२९ इतकी नोंदवली गेली.

# राष्ट्रीय जनगणना अभियानाला वेग; प्रगणकांचे प्रशिक्षण शिबिर सुरु

प्रतिनिधी २७ एप्रिल



**यवतमाळ :** राष्ट्रीय जनगणना अभियानांतर्गत शहरी भागातील प्रगणकांसाठी २४ एप्रिल ते ६ मे २०२६ या कालावधीत विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून जिल्हाधिकारी विकास मिना यांनी प्रशिक्षण स्थळाला भेट देत कामकाजाचा आढावा घेतला.

शहरातील विभागनिहाय प्रगणकांना माँ जिजाऊ नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २० येथे आयोजित शिबिरात फील्ड ट्रेनरमार्फत प्रशिक्षण दिले जात आहे. या वेळी जनगणना जिल्हा समन्वयक जतिन माहेश्वरी व तहसीलदार विद्या शेंडे यांनीही मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणासाठी प्रगणकांची तीन तुकड्यांमध्ये विभागणी करण्यात आली असून ६ मेपर्यंत हे शिबिर सुरू राहणार आहे. दरम्यान, प्रशिक्षणास अनुपस्थित राहिलेल्या ११ प्रगणकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. संबंधितांनी समाधानकारक खुलासा न दिल्यास जनगणना अधिनियम १९४८ व जनगणना नियम १९९० अंतर्गत तसेच भारतीय न्यायसंहितेच्या कलम १८७नुसार कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात गृहगणना करण्यात येणार असून प्रगणक व पर्यवेक्षक यांच्यातील समन्वय, नागरिकांशी संवाद साधण्याची पद्धत तसेच प्रपत्रक भरण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

या शिबिरासाठी डॉ. विनोद डवले, विलास काळे, मजहर अली, राजेंद्र मेनकुदळे, लक्ष्मीकांत कांबळे व प्रमोद शिंदे हे फील्ड ट्रेनर म्हणून कार्यरत असून प्रशिक्षण व्यवस्थापनाची जबाबदारी शेख साजिद यांनी सांभाळली आहे.

# वैद्यकीय परिषदेची बुधवारी मतमोजणी

प्रतिनिधी २७ एप्रिल

**यवतमाळ :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या नऊ जागांसाठी रविवारी जिल्ह्यातील पाच केंद्रांवर शांततेत मतदान पार पडले. सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेत प्रक्रिया सुरळीत झाली. मतदारसंख्या कमी असल्याने मतदानात कोणतीही गडबड झाली नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही निवडणूक घेण्यात आली असून, वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधित्वासाठी ती महत्त्वाची मानली जाते. एकूण ६० उमेदवार निवडणूक रिंगणात असून, तीन पॅनलमध्ये चुरस रंगली आहे. जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाच मतदान केंद्रांवर प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यातील २,०४२ नोंदणीकृत व नूतनीकरण केलेले डॉक्टर मतदानासाठी पात्र होते. प्रत्येक मतदाराला नऊ उमेदवारांना मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. उन्हाचा तडाखा असूनही मतदान शांततेत पार पडले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. निवडणूक प्रक्रियेत महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, मतमोजणी मुंबई येथील हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्थेत बुधवारी २९ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. त्यामुळे उमेदवारांसह वैद्यकीय क्षेत्राचे लक्ष आता निकालाकडे लागले आहे.

# माथार्जुन बसस्टॉपजवळ भरधाव ट्रॅक्टर पलटी

प्रतिनिधी २७ एप्रिल



**झरी जामणी :** झरी–पांढरकवडा मार्गावरील माथार्जुन बसस्टॉपजवळ सोमवारी दुपारी भरधाव ट्रॅक्टर पलटी झाल्याची घटना घडली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठा अनर्थ टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

प्राथमिक माहितीनुसार, संबंधित ट्रॅक्टर वेगात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रॅक्टर रस्त्याच्या कडेला जाऊन अचानक पलटी झाला. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती स्थानिकांकडून मिळाली आहे. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. काही नागरिकांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठीही पुढाकार घेतला.

या अपघातात ट्रॅक्टरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. दरम्यान, घटनेची माहिती पोलिस प्रशासनाला देण्यात आली असून संबंधित यंत्रणेकडून पंचनामा करण्यात आला आहे. फरार चालकाचा शोध सुरू असून अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# उष्णतेच्या लाटेत शिष्यवृत्ती परीक्षा दुपारी; शिक्षण विभागाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी २७ एप्रिल

**दारव्हा :** जिल्ह्यात तापमानाचा पारा ४४ ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचलेला असताना शाळांचे सत्र सकाळी हलविण्यात आले आहे. मात्र, याच पार्श्वभूमीवर शिष्यवृत्ती परीक्षा दुपारच्या वेळेत घेण्याचा निर्णय का, असा सवाल उपस्थित होत असून बहुजन मुक्ती पार्टीने शिक्षण विभागाचे लक्ष वेधले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात रविवारी विविध तालुक्यांमध्ये शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. परीक्षेचे वेळापत्रक सकाळी ११ ते १२.३० आणि दुपारी २ ते ३.३० असे ठेवण्यात आले आहे. वाढत्या उष्णतेमुळे नियमित शाळा सकाळच्या सत्रात सुरू असताना परीक्षा मात्र दुपारी घेण्याचा निर्णय विसंगत असल्याची टीका होत आहे.

दारव्हा येथील काही परीक्षा केंद्रांवर टिनपत्राच्या खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. अशा उष्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी परीक्षा देणे कठीण ठरत असल्याची भावना पालक व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

बहुजन मुक्ती पार्टीचे बिमोद मुधाने यांनी निवेदनाद्वारे शिक्षण विभागाला जाब विचारला असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून भविष्यात परीक्षा वेळापत्रक ठरवावे, अशी मागणी केली आहे.

या संदर्भात प्रशासनाची भूमिका काय राहते, याकडे लक्ष लागले आहे.

# स्मार्ट नागापूर येथे 'ग्राहक संवाद' व आर्थिक साक्षरता मेळावा

प्रतिनिधी २७ एप्रिल




**उमरखेड :** स्मार्ट नागापूर येथे भारतीय स्टेट बँक, उमरखेड शाखेच्या वतीने 'ग्राहक संवाद' व आर्थिक साक्षरता मेळाव्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. जि.प. उच्च प्राथमिक शाळेतील स्व. प्राचार्य डॉ. आप्पाराव कुरमे रंगमंचावर पार पडलेल्या या कार्यक्रमाला ग्रामस्थांसह बचत गटांच्या महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गोदाजी जाधव होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शाखा व्यवस्थापक प्रदीप फटींग यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी बँकेच्या विविध बचत व गुंतवणूक योजना, शेतकऱ्यांसाठी कर्ज योजना, विमा संरक्षण तसेच डिजिटल बँकिंगचा सुरक्षित वापर याबाबत सविस्तर माहिती दिली. आर्थिक व्यवहार करताना सुरक्षिततेची काळजी घेणे आणि बँकिंग सेवांचा अधिकाधिक लाभ घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या मेळाव्यात विशेषतः आर्थिक साक्षरतेवर भर देण्यात आला. ग्रामीण भागातील नागरिकांनी बँकिंग सेवा समजून घेत आत्मनिर्भर होणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चितांगराव कदम यांनी केले. सूत्रसंचालन पद्मावती लोमटे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अंबादास कदम यांनी केले.

यावेळी पंचायत समितीच्या माजी सभापती सविता कदम, मुख्याध्यापक सतीश घोडके, छाया चाकोरे, संदीप कवडे, सुनंदा जाधव यांच्यासह ग्रामस्थ, बचत गटांच्या महिला, युवक तसेच बँकेचे खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेचे कर्मचारी राहुल भारस्कर, विठ्ठल चव्हाण व विनोद वाहुळे यांनीही सहभाग नोंदविला.

मेळाव्यात सुमारे १०० खातेदारांनी बँकेच्या विमा योजनेचा लाभ घेऊन स्वतःचे आर्थिक संरक्षण करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# 'जागतिक हिवताप दिन'; जनजागृती रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २७ एप्रिल



**यवतमाळ :** हिवताप (मलेरिया) निर्मूलनासाठी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हा हिवताप विभागाच्या वतीने २५ एप्रिल रोजी 'जागतिक हिवताप दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात विविध आरोग्य उपक्रम राबवून हिवतापमुक्त जिल्ह्याचा संकल्प करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. टी. ए. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते डॉ. रोनाल्ड रॉस यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

**शहरात जनजागरण रॅली**

या निमित्ताने यवतमाळ शहरात भव्य जनजागरण रॅली काढण्यात आली. नर्सिंग कॉलेजच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून नागरिकांचे लक्ष वेधले. तसेच आरोग्य विभागातर्फे विविध ठिकाणी पोस्टर, भिंतीपत्रके व हिवताप प्रतिबंधक संदेशांद्वारे जनजागृती करण्यात आली.

**प्रत्यक्ष प्रतिबंधात्मक उपाययोजना**

प्रचाराबरोबरच प्रत्यक्ष कृतीवर भर देत शहर व जिल्ह्यात साचलेल्या पाण्यात गप्पी मासे सोडण्यात आले तसेच टेमीफॉसचा वापर करून डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न करण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक जिल्हा हिवताप अधिकारी रेशमा शेंगर, अश्विनी हांडे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी रितेश भगत, तालुका पर्यवेक्षक संजय डांगे, आरोग्य निरीक्षक अनिल परचाके यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरोग्य निरीक्षक धीरज पिसे यांनी केले. यावेळी हिवताप विभागातील कर्मचारी, कीटकसमारक व आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### आरोग्य विभागाचे आवाहन

■ हिवताप हा डासांमुळे होणारा आजार असल्याने नागरिकांनी घराभोवती पाणी साचू देऊ नये, दर रविवारी 'कोरडा दिवस' पाळावा तसेच तापाची लक्षणे दिसताच त्वरित शासकीय रुग्णालयात तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले.

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मंगळवारपासून प्रत्येक पंचायत समितीत रोजगार मेळावा

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमेंतर्गत मंगळवार, दि. २१ एप्रिलपासून दि. ८ मेपर्यंत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक पंचायत समितीमध्ये हा रोजगार मेळावा होणार आहे. मेळाव्यामध्ये हैद्राबाद येथील गार्डियन ट्रेनिंग अकादमीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येते. कंपनीला आवश्यक असलेल्या पात्रतेच्या पदासाठी सदर कंपनीचे प्रतिनिधी लेखी परीक्षा घेऊन मुलाखती घेतील. मेळाव्यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

# स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्रात विदर्भस्तरीय जलतरण स्पर्धेचे उद्घाटन

प्रतिनिधी २७ एप्रिल

**अमरावती :** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीच्या स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्र व श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भस्तरीय जलतरण स्पर्धेचे उदघाटन २६ एप्रिल २०२६ रोजी झाले. स्पर्धेचे आयोजन स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्र, अमरावती येथे करण्यात आले. उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष . दिलीपबाबू इंगोले तसेच उदघाटक म्हणून वैशाली पाथरे(पाटील), सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, अमरावती उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ?डव्होकेट गजानन पुंडकर (उपाध्यक्ष, श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती), वैशाली इंगळे (क्रीडा अधिकारी, अमरावती) , राजाभाऊ सुंदरकर,सदस्य, स्व अनंत पंजाबराव देशमुख स्मृति केंद्र तसेच मा. प्रा. डॉ. अशोक घोगरे




(माजी सचिव, स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्र) इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

उद् घाटन प्रसंगी सर्वप्रथम मा. ?डवोकेट गजानन पुंडकर यांनी आपल्या मनोगतातून जलतरण या क्रीडा प्रकाराचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले. नियमित सराव, शिस्त, चिकाटी आणि क्रीडाभाव या गुणांच्या जोरावर खेळाडूंनी प्रगती साधावी, असे मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या उदघाटक वैशाली पाथरे(पाटील), यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, जलतरण हा सर्वांगीण विकास घडवणारा महत्त्वाचा क्रीडा प्रकार असून विद्यार्थ्यांनी नियमित सराव, शिस्त व आत्मविश्वास यांच्या बळावर या क्षेत्रात प्रगती साधावी. अशा स्पर्धांमुळे खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखवण्याची संधी मिळते व भविष्यात मोठ्या स्तरावर पोहोचण्याचा मार्ग मोकळा होतो, असे त्यांनी नमूद केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, क्रीडा क्षेत्रात यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन अत्यंत आवश्यक आहे. जलतरणासारख्या खेळांमुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक ताकदही वाढते. संस्थेमार्फत खेळाडूंना सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात असून भविष्यात अधिक दर्जेदार स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सदर स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने जलतरणपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध वयोगटांमध्ये आणि विविध प्रकारांमध्ये स्पर्धा पार पडणार असून स्पर्धेच्या निमित्ताने जलतरण क्षेत्रात नवीन प्रतिभेला वाव मिळणार आहे. याप्रसंगी मा. वैशाली पाथरे, सहायक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष अमरावती यांना राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धा अंतर्गत राज्यस्तरावर सर्वोत्कृष्ट कल्पना उपक्रम शासकीय संस्था या संकल्पनेसाठी महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल, त्याचप्रमाणे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मा. श्री मंगेश व्यवहारे व नुकत्याच बँकॉक येथे भारताच्या स्विमिंग टीमचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक म्हणून प्रतिनिधित्व करणारे मा.डॉ. योगेश निर्मळ यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजनाची माहिती श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्वर्गीय अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्राचे सचिव डॉ. सुभाष गावंडे यांनी दिली. त्यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री शिवाजी हायस्कूल स्टेशन ब्रांच शाखा अमरावती चे मुख्याध्यापक तसेच स्वर्गीय अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्राचे सदस्य, संदीप इंगोले यांनी केले. सदर स्पर्धा अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्राचे सचिव तथा श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, जलतरण केंद्रावर कार्यरत प्रशिक्षक , कर्मचारी, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# ट्रान्सपोर्ट नगरातून दोन युवक ताब्यात



प्रतिनिधी २७ एप्रिल

**अमरावती :** २६ रोजी गुन्हे शाखेच्या सपोनी मनीष वाकोडे व त्यांचे पथकाने नागपुरी गेट हद्दीमध्ये ट्रान्सपोर्ट नगर येथे दोन इसमांना अग्निशस्त्र व चाकूसह ताब्यात घेतले आहे.

आरोपीतांचे नाव अजहर खान जुरावर खान उर्फ अजहर चायना वय ३० वर्ष राहणार पठाण चौक अमरावती, अब्दुल नफिज अब्दुल हफिज वय ३२ वर्षे राहणार रहमत नगर अमरावती असे आहे.

यांच्याकडून एक पिस्टल मॅक्झिमसह एक जिवंत राऊंड, एक लोखंडी कुकरी, एक फोल्डिंगचा चायना चाकू असा २९०००/ऱ् रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दोन्ही आरोपी विरुद्ध शस्त्र कायद्याप्रमाणे पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथे गुन्हा नोंद करणे सुरू आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत प्रवेशाबाबत सूचना

प्रतिनिधी २७ एप्रिल

**धारणी:** येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमातील नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिलीमध्ये (सन २०२६-२७) प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक पालकांना २७ एप्रिल २०२६ पासून प्रकल्प कार्यालय धारणी तसेच त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये विनामूल्य अर्ज उपलब्ध होणार आहेत. प्रकल्प कार्यालयाद्वारे पात्र विद्यार्थ्यांची निवड करून वरिष्ठ कार्यालयाच्या मंजुरीनंतर निश्चित शाळांमध्ये प्रवेश दिला जाणार आह, असे प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी सिध्दार्थ शुक्ला यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक असून, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपर्यंत असावे. विद्यार्थ्याचे वय किमान ६ वर्षे पूर्ण असणे गरजेचे आहे. अर्जासोबत जातीचा दाखला, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधारकार्ड, वैद्यकीय प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. निवासी शाळांमध्ये प्रवेशासाठी दारिद्र्यरेषेखालील, आदिम जमातीतील तसेच विधवा, घटस्फोटीत किंवा निराधार पालकांच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.

प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० मे २०२६ असून, त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अपूर्ण किंवा चुकीची माहिती दिल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. पात्र पालकांनी सर्व अटी व शर्ती पूर्ण करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज वेळेत सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी शुक्ला यांनी केले आहे.

# हिंदू नाव धारण करून मुलींना फसवणारे रॅकेट अमरावतीत सक्रिय, हॉकर्सची मस्ती उतरावी लागेल

प्रतिनिधी २७ एप्रिल

## भाजपचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांची टीका

**अमरावती:** शहरात रस्त्यांवर चायनीजच्या गाड्या लावणाऱ्या मुस्लिम हॉकर्सनी हिंदू नाव धारण करून हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे सातत्याने लैंगिक शोषण केले असल्याची घटना उघडकीस आली आहे. एका हिंदू युवतीच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी या प्रकरणी बलात्काराचा गुन्हा दाखल करून दोन मुस्लिम आरोपींना अटक केली आहे.

हे प्रकरण एका युवतीला फसवायचे नसून यातील मुख्य आरोपी रियाजुद्दीन फैयाजुद्दीन पठाण याने याच पद्धतीने अनेक युवतींना फसवून त्यांचे लैंगिक शोषण केले असल्याचा खळबळ जनक आरोप पीडित युवतीने केला आहे. रियाजउद्दीन ची चायनीज गाडी पंचवटी



चौकात ँई कॉलेज जवळ उभी असते. हिंदू नाव धारण करून आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या, लग्न ठरत नसलेल्या किंवा कुठल्यातरी समस्येने ग्रस्त असलेल्या तरुणींना सुरुवातीला आधार देण्याचे नाटक करायचे आणि नंतर प्रेमाचे नाटक करून त्यांचे लैंगिक शोषण करण्याचा धंदा रियाज उद्दीनने केला आहे. हे करण्यासाठी त्यांनी हिंदू नाव धारण केले होते. रियाझउद्दीन स्वतःचे नाव राजू असे सांगायचा. शिवाय आपल्याला बंगालची जादू येते आणि त्या जादूच्या आधारे तुला समस्येतून मुक्त करून देईल अशी भोंदूगिरी देखील तो करायचा. समस्याग्रस्त युवतींना अज्ञात स्थळी नेऊन उपचारांच्या नावाखाली हळूहळू त्यांच्या प्रायव्हेट पाट्र्सला अत्तर लावणे आणि असे करता करता त्या युवतींवर शारीरिक ताबा मिळवायचा असे भयंकर प्रकार या रियाजुद्दीन केले आहे. अमरावती पोलिसांनी रियाजुद्दीन फैयाजुद्दीन पठाण याच्यासह आणखी एकाला अटक केली आहे. पण हे प्रकरण केवळ बलात्काराचे नसून हे मोठे रॅकेट असल्याचा संशय पिडीतेच्या कथनावरून निर्माण झाला आहे. असा आरोप भाजपचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी केला आहे. अमरावती शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर असलेली हॉकर्सची दादागिरी संपूर्ण ची गरज देखील या निमित्ताने निर्माण झाली आहे. परतवाड्याचे प्रकरण जेवढे गंभीर आहे तेवढेच किंवा त्याहूनही जास्त गंभीर प्रकरण रियाजुद्दीनचे आहे. ज्या ज्या युवती याच्या जाळ्यात फसल्या त्यांचे नग्न अवस्थेतील फोटो काढून त्यांना नेहमीसाठी ब्लॅकमेल करण्याची पद्धत रियाजउद्दीन वापरत होता. अमरावती पोलिसांनी याप्रकरणी केवळ एक बलात्काराचे प्रकरण न पाहता यामागे सक्रिय असलेले रियाजउद्दीन व त्याच्या साथीदारांचे रॅकेट शोधून काढले पाहिजे, अशी विनंती मी अमरावती पोलिसांना करत आहे. लव जिहादचा हा नवा प्रकार आहे. हिंदू युवतींनी हॉकर्सची खात्री करूनच त्यांच्या गाडीवर जाण्याचा निर्धार केला पाहिजे, असेशिवराय कुळकर्णी यांनी सांगितले.

# बँकांनी उद्योगांना कर्जवाटप करताना सकारात्मक रहावे - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी २७ एप्रिल


## उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा गौरव

**अमरावती:** गाव पातळीवर उद्योग उभारताना आवश्यक असलेला पतपुरवठा बँकांनी करावा. यामुळे गावातही चांगले प्रक्रिया उद्योग उभे राहण्यास मदत मिळेल. त्यामुळे बँकांनी कर्जवाटप करताना उद्योगाप्रती सकारात्मक रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगामध्ये कर्ज मंजूरीचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, जिल्हा उद्योग अधिकारी निलेश निकम, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी बँकांची निर्मिती ही छोट्या उद्योगांना पतपुरवठा करण्यासाठी झाली आहे. हा पतपुरवठा हा



सामान्य नागरिकांनी बचतीच्या स्वरूपात गोळा केलेल्या पैशातून केला जातो. मोठ्या उद्योगाप्रती बँकांचे धोरण सकारात्मक असताना छोट्या उद्योगांनाही पतपुरवठा करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. गावातील प्रक्रिया उद्योगांना पतपुरवठा झाल्यास ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होईल. गेल्या वर्षी जिल्ह्याने प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगांमध्ये राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला आहे. संपूर्ण जिल्ह्यात शासन सहाय्य करणाऱ्या योजनांची एक हजाराहून प्रकरणे बँकांकडे सादर केली आहे. यात महिलांचा लक्षणीय सहभाग आहे. त्यामुळे सार्वजनिक आणि खासगी बँकांनी उद्योगांना मदत करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केलेल्या बँक व्यवस्थापकांचा सत्कार करण्यात आला. यात बँक ऑफ बडोदाचे प्रशांत गावंडे, लोहिता के.एस., जयदीप राठोड, बँक ऑफ इंडियाचे रणजीत ठाकरे, घनश्याम ढवळे, बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रफुल शेंडे, प्रशांत चरडे, रुपेश नंदनवार, प्रफुल रसाळपायले, शिवशंकर फड, आलोक कोठेकर, मृणाल क्रांती राणा, कॅनरा बँकेच्या योगिता देशमुख, संदीप तेटे, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अजित लिंगाटे, महेंद्र येलमे, नवनीत उमाळे, अमर दाभर्डे, संदीप सूर्यवंशी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे सुदीप्ता घोष, जयंत मोरे, पंकज समर्थ, कमर सगीर, रिचा निमोणकर, मधुकर तळपदे, अभिनव राऊत, निधी अग्रवाल, युनियन बँक ऑफ इंडियाचे अक्षय सोनोने, तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक व्यवस्थापक नवीनकुमार उप्पलवार, मुख्य व्यवस्थापक रविकुमार दालु, ललित त्रिपाठी, बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रादेशिक व्यवस्थापक महेश डांगे, प्रोसेसिंग हेड प्रवीण जंगम, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे एलडीएम नरेश हेडाऊ, प्रादेशिक व्यवस्थापक सुनील पांडे, कॅनरा बँकेचे प्रादेशिक व्यवस्थापक रामबाबू मीना, बँक ऑफ बडोदाचे प्रादेशिक व्यवस्थापक राजेश कुमार, बँक ऑफ महाराष्ट्रचे जिल्हा समन्वयक अमोल मोरे यांचा स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

# रजिया सुलताना यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



प्रतिनिधी २७ एप्रिल

**अमरावती :** जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका रजिया सुलताना यांच्या गाडगेबाबाच्या किर्तनातील समाजचिंतन या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच पुणे येथे एस.एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन येथे झाले.

प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे डॉ. सदानंद मोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणुन निवृत्त पोलीस महासंचालक अशोक धिवरे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे, उत्तराखंड महिला आयोगाच्या उपाध्यक्षा शायरा बानो, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष शमोसुद्दीन तांबोळी आणि हैदराबादचे कथा लेखक शेख युसुफ हजर होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रशियन भाषातज्ञ ईशाद वडगावकर यांनी केले, आभार प्रदर्शन दिलावर शेख यांनी केले.

# दर्यापुरात तडोकार ज्वेलर्स फोडण्याचा प्रयत्न

## सायरन वाजल्याने चोरटे पळाले

प्रतिनिधी २७ एप्रिल




**अमरावती :** आज पहाटे ३.१५ दरम्यान आठ ते दहा जणांच्या चड्डी-बनियान टोळी ने गौरक्षण चौक नजिक असलेल्या संतोष तळोकार यांचे ज्वेलर्स फोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला. मात्र या ठिकाणी असलेली सायरन वाजल्याने टोळीने कुलूप फोडून पळ काढला. हा सर्व प्रकार येथील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला असून जेव्लर्स च्या संचालकांनी सायरन यंत्राची शक्कल लढवल्याने चड्डी बनियान टोळी च्या चोरट्यांचा चोरीचा यशस्वी प्रयत्न फसला आहे. घटनास्थळावर दर्यापूर पोलिसांनी जाऊन पंचनामा केला असून या चोरीच्या प्रयत्नामुळे सुवर्णकार बांधवांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही महिन्यापूर्वी सुद्धा दर्यापुरात दोन ज्वेलर्स फोडण्यात आले होते.

# अट्टल चोरांना ताब्यात घेवुन चोरी गेलेल्या १४ मोटारसायकली जप्त

प्रतिनिधी २७ एप्रिल

**अमरावती :** अमरावती शहर ग्रामीण हददतुन मोटर सायकल चोरी करणाऱ्या अटटल चोराना अटक ताब्यात घेवुन चोरी गेलेल्या एकुण १४ मोटर सायकल जप्त गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगीरी केली आहे.

पोलीस आयुक्त यांनी आदेश दिले होते की, रेकॉर्ड वरील वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हेगारांना चेक करून व त्यांचेवर पाळत ठेवुन योग्य प्रभावी कार्यवाही करण्याबाबत आदेश प्राप्त झाले वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप वव्हाण यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.




पोलीस आयुक्तालय हद्दीत पो. स्टॉफसह रेकॉर्ड वरील वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हेगार चेकिंग करीता पेट्रोलींग करीत असतांना. दिनांक २५/०४/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि, पोलीस स्टेशन गाडगे नगर अपराध क्रमांक ४०४/२०२६ कलम ३०५ (ब) भा. न्या. सं. मधील चोरीस गेलेली मोटार सायकल दोन इसम हे आय.एम.ए. हॉल समोरील रस्त्यावर मोटार सायकल विकी करण्याचे उद्देशाने येत आहेत. अशा माहीती वरून दोन इसम हे होन्डां सि.डी डिलक्स गाडी ने दयासागर चौक रोड कडुन येत असतांना दिसुन आले. सदर इसम हे नमुद माहीती प्रमाणे असल्याची खात्री झाल्याने त्या दोन्ही इसमास वाहनासह पो. स्टाफचे मदतीने थांबवुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमास त्यांचे ताब्यातील वाहना बाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिली व वाहनाचे कागदपत्रे नसल्याचे सांगीतले वरून दोन्ही इसमास त्याचे नांवगांव विचारले असता त्याने त्यांचे नांव गौरव विठ्ठल ढोणे वय ३० वर्ष रा. म्हैसपुर ता. भातकुली जि. अमरावती, सुरज उर्फ भोला मुन्नालाल सकवार वय ३० वर्ष रा. नांदेड बु. ता. दर्यापुर जि. अमरावती असे सांगीतले त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की, त्यांचे ताब्यात असेलेली हिरोहोन्डा सि.डी डिलक्स गाडी त्यांनी अंदाजे १५ दिवसापूर्वी डफरीन हॉस्पीटल येथिल पार्कींग शेड मधुन चोरी केलेली असल्याचे सांगीतले तसेच शहरातील इतर चोरीचे मोटार सायकली बाबत विचारपुस केली असता. त्यांने कबुली दिल्यावरून त्यास सदर गुन्हयात ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन नमुद गुन्हयातील मोटार सायकल व इतर गुन्हयातील मोटार सायकली जप्त करण्यात आले त्याचे वर्णन खालील प्रमाणे. नमुद दोन्ही आरोपी गौरव विठ्ठल ढोणे वय ३० वर्ष रा. म्हैसपुर ता. भातकुली जि. अमरावती, सुरज उर्फ भोला मुन्नालाल सकवार वय ३० वर्ष रा. नांदेड बु. ता. दर्यापुर जि. अमरावती याचे ताब्यातुन वरील प्रमाणे एकुण १४ मोटार सायकली चे कि.अं. ७,२५,०००/- रू चा माल जप्त करण्यात आला आहे. नमुद ताब्यात असलेले दोन्ही आरोपी यांचा साथीदार रोशन थोरात रा. खोलापुर ता. दर्यापुर जि. अमरावती याचा पो. स्टापचे मदतीने शोध घेतला असता तो मिळून आला नाही.

६
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि २७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


मंगळवार दि.६ फेब्रुवारी २०२४
जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याचा अजब कारभार!
*नियम डावलून केल्या वारसाच्या नावे स्वस्त दुकानाच्या नोंदी

## भ्रष्ट शासन, धान्याचे राशन, दुकानदाराचे पोषण, गरीबांचे शोषण

# नियम डावलून अनागोंदी, वारसाच्या नावे दुकानाच्या नोंदी !

### *पिढ्यांपिढ्या एकाच कुटुंबात राशन दुकान * बनले गावात गोरगरीबांना लुटण्याचे मकान *पुरवठा विभाग भ्रष्टाचाराचे ठिकाण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शासनाच्या वतीने गरीबांना स्वस्त धान्य पुरवठा केल्या जातो, त्यासाठी जिल्हा पुरवठा विभागामार्फत राशन दुकानदारांच्या वतीने धान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात येते. मात्र, या यंत्रणेला भ्रष्ट अधिकारी माफिया व दुकानदारांनी सुरंग लावला आहे. राशनचा काळाबाजार जगजाहीर होत असतांना भ्रष्ट शासन धान्याच्या राशनातून दुकानदाराचे पोषण करीत असून गरीबांचे शोषण करीत आहेत. वर्षानुवर्ष एकाच घरात वारसाच्या नावे नोंदी करीत असल्याचे उघड झाले आहे. अनुकंपाचा व वारसाचा असा कोणताच नियम नसतांना नियम डावलून जिल्ह्यात शेकडो दुकानदारांना त्यांच्या वारसाच्या नावे दुकानाच्या नोंदी करून दुकाने चालवित असल्याचे उघड झाले आहे. नियमानुसार कार्यकाळ संपल्यानंतर आता बचत गटांना राशन दुकान देण बंधनकारक असतांनाही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी रास्त धान्य दुकानदारांच्याच वारसाच्या नावे नोंदी केल्याचे उघड झाले आहे. जिल्हा पुरवठा विभागाच्या अजब गजब कारभाराचा नियम डावलून अनागोंदी प्रकार अंगलट येणार आहे.










तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी व तात्कालीन तहसीलदार रिसोड यांनी उपलब्ध दुकानाचा नवीन परवाना मृत वारसदाराच्या वारसाला देताना करावयाच्या सहा अटींमध्ये रास्त धान्य दुकानदाराच्या फेवरला माहिती देऊन परवाना त्यांच्या वारसाच्या नावे करावयासाठी ज्या गोष्टी होत्या त्या गोष्टीला एक प्रकारची अर्थपूर्ण साथ दिलेली आहे कर्मचारी सेवानिवृत्त होताना त्यांचे वय ५८ वर्षे झाल्यावर त्यांना सेवानिवृत्त केल्या जाते परंतु ६५ वर्ष होऊनही व गेल्या दोन-तीन पिढ्यापासून चालत आलेला रास्तधान्य दुकानाचा परवाना हा आपल्या पुढच्या पिढीला देऊन त्यांचा जीवनभराचा उदरनिर्वाह प्रश्न कायम स्वरुपी करण्याचे मुख्य साधन हे स्वस्त धान्य दुकान बनले आहे स्वस्तधान्य दुकानदाराकडे करोडोची संपत्ती असून त्यांच्याकडे किराणा दुकान, कृषी सेवा केंद्र, फहार्डवेअर, पेट्रोल पंप, जेसीबी, ट्रॅक्टर, कॉन्ट्रॅक्टर, कुटुंबातील काही लोक नोकरीला असून अन्य उत्पन्नाचे साधन असताना तहसीलदार यांनी त्यांच्या सहा मुद्द्यांमधील पाचव्या मुद्द्यावर सदर वारसांच्या उदरनिर्वाह हा रास्त धान्य दुकानावरच अवलंबून आहे अशा प्रकारची माहिती दिलेली आहे यावरून हे लक्षात येते की ह्या सर्व गोष्टी संगणमताने करून पुढील पिढीच्या उत्पन्नाचे साधन दुकानदार यांनी तयार करून ठेवलेले आहे त्यामध्ये रिसोड तालुक्यातील पांडुरंग लक्ष्मण कोकाटे मोरगव्हान व अजाबराव बाबुराव देशमुख मोठेगाव या व इतर शेकडो दुकानदाराचा समावेश असून असेच ५० टक्क्याहून अधिक दुकाने ही

### नावालाच अनुकंप...
### भ्रष्टाचाराचा अंत, दुकानदार जिवंत

आपल्या वारसाला दुकान मिळण्यासाठी दुकानदार जिवंत असतांना नियम डावलून भ्रष्ट अधिकाऱ्यांशी संगणमत करून अनुकंपाचा कोणताही नियम नसतांना जिल्ह्यातील शेकडो राशन दुकानदारांनी आपल्या वारसाच्या नावे दुकानाच्या नोंदी केल्याचे प्रकार पुराव्या निशी सिटी न्युज सुपरफास्टच्या हाती लागले आहेत.

रिसोड तालुका व जिल्ह्यात वारसाच्या नावे चुकीच्या नोंदी देऊन करण्यात आलेले आहेत तरी संपूर्ण बाबीची रीतसर चौकशी करून खोटी माहिती जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना देणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदार व त्यांच्या वारसावर करण्यात यावी व त्यांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करून नव्याने जाहिरात काढून गरजवंतांच्या गटाला व सेवा सहकारी संस्थांना दुकाने देण्यात यावी अशा प्रकारची मागणी जनतेतून होत आहे.

## थोडक्यात

### सौ.दिपाली मेहत्रे यांची कलाशिक्षण पाठ्यपुस्तकासाठी निवड

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा लाड येथील कंकुबाई माध्यमिक कन्या शाळेच्या कर्तव्यदक्ष कलाध्यापिका सौ.दिपाली सुशांत मेहेत्रे यांची महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ बालभारती यांच्या वतीने इयत्ता सहावीच्या कलाशिक्षण पाठ्यपुस्तकासाठी समीक्षक म्हणून निवड झाली आहे.



सौ.दिपाली मेहेत्रे ह्या गेल्या २५ वर्षांपासून विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत.विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी त्या विविध उपक्रम राबवत असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास व सर्जनशीलता विकसित होत आहे.मराठी साहित्य, गझल लेखन व ललित लेखनाची त्यांना विशेष आवड असून त्यांच्या लेखनातून संवेदनशीलता आणि कलात्मकता प्रकर्षाने दिसून येते.शाळेमध्ये त्यांनी साकारलेले आकर्षक व विचारप्रवर्तक फलक लेखन सतत विद्यार्थी, पालक व अधिकारी यांचे लक्ष वेधून घेत असते.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत शाळेमार्फत फलक लेखनावर आधारित पुस्तक प्रकाशित करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

अलीकडेच शाळेमध्ये प्राप्त झालेल्या मेलद्वारे सौ.मेहेत्रे मॅडम यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, बालभारती यांच्या वतीने इयत्ता सहावीच्या कलाशिक्षण पाठ्यपुस्तकासाठी समीक्षक म्हणून त्यांची निवड झाली आहे.ही निवड त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून मनःपूर्वक अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

### मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

**मानोरा :** तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

## गोरगरिबांच्या समस्या सोडविण्यासाठी सिटीन्यूज सुपरफास्ट कटिबद्ध !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यात शासनाकडून सुरू करण्यात आलेल्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. गोरगरिबांसाठी असलेल्या या योजना भ्रष्टाचाराचा बकासुर फस्त करीत असल्याचे वास्तव समोर येत असून या बाबत प्रशासनाकडे अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र गल्ली ते दिल्ली भ्रष्टाचार बोकाळल्याने सर्व सामान्य लोकांच्या तक्रारीला केराची टोपली दाखवून गरिबांची थट्टा केली जात आहे.पारदर्शक असलेल्या शासनासाठी ही लज्जास्पद बाब आहे. अशा समस्यांना उजागर करण्यासाठी सिटीन्यूज सुपरफास्ट कटिबद्ध असून दुर्लक्षित तक्रारींची छायांकित एक प्रत व त्यासंबंधीचे फोटो विविध पुरावे सिटीन्यूज सुपरफास्टकडे पाठविल्यास त्याचा शासन दरबारी पाठपुरावा केला जाईल असा उपक्रम दैनिक सिटीन्यूज सुपरफास्टने हाती घेतला आहे.

रिसोड तालुक्यातील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, शासनाच्या घरकुल योजनेबाबत काही अडचणी, तक्रारी किंवा अन्याय होत असल्यास संबंधित बाबी गांभीर्याने मांडणे अत्यंत आवश्यक आहे. घरकुल संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास प्रथम पंचायत समिती कार्यालय, रिसोड येथे लेखी स्वरूपात तक्रार दाखल करावी. तथापि, संबंधित तक्रारीवर कोणतीही कारवाई होत नसल्यास अथवा समाधान कारक मार्ग निघत नसल्यास, नागरिकांनी निराश न होता पुढील पाऊल उचलावे. आपल्याकडे असलेले सर्व पुरावे (दस्तावेज, फोटो, इतर माहिती) यासह दैनिक सिटीन्यूज सुपरफास्ट कार्यालयाशी संपर्क साधावा. आपल्या तक्रारीला न्याय मिळवून देण्यासाठी तसेच जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी दैनिक सिटीन्यूज सुपरफास्ट कटिबंध आहे. नागरिकांनी खालील संपर्क क्रमांकावर व्हाट्सअप द्वारे आपली माहिती पाठवावी. संपर्क क्रमांक - ८७६६८५४१४७, ९३७३५७८४२९ आपला हक्क-आपला आवाज अन्यायाविरोधात पुढे या, आपल्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत- दैनिक सिटीन्यूज सुपरफास्ट कार्यालय वाशिम.

## रिसोड न.प.च्या जनगणना -२०२७ प्रशिक्षण सत्राला प्रारंभ

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

जनगणना-२०२७ च्या पार्श्वभूमीवर नगर परिषद यंत्रणा सज्ज झाली असून प्रगणक व पर्यवेक्षक यांच्या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिराला दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी नगर परिषद सभागृहामध्ये प्रारंभ झाला आहे.

जनगणना-२०२७ हि पूर्णपणे डीजीटल पद्धतीने होणार असून माहितीची गोपनीयता आणि सुरक्षितता यावर भर देण्यात येणार असल्याबाबत सांगितले. जनगणना २०२७ हि दोन चरनात होणार असून पहिल्या चरणात घरयादी गणना होणार असून दुसऱ्या चरणात व्यक्ती गणना होणार असल्याबाबत नमूद केले. प्रथम चरण हे दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधी मध्ये होणार असून त्याआधी दिनांक ०१ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीमध्ये सर्व नागरिकांना स्वःगणना नोंदविता येणार असलेबाबत सांगितले.जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेतलेले तज्ञ प्रशिक्षक यांचेमार्फत सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षक यांना तीन दिवसात सखोल प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षक यांनी गांभीर्यपूर्वक प्रशिक्षण घ्यावे असे सूचित केले.यावेळी नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी तथा अतिरिक्त चार्ज जनगणना अधिकारी श्री.शिवनंदन बरडे, क्षेत्रीय प्रशिक्षक श्री.दिपक बाजड व श्री.आनंद भावसार तसेच नगर परिषद कमर्चारी उपस्थित होते.

## मंगरूळपीरच्या शिरपेचात मानाचा तुरा

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर नगरीमध्ये वास्तव्यास असलेले आणि गृहरक्षक (होमगार्ड ) या पदावर कार्यरत असलेले संजय घाटे यांचे चिरंजीव सुमित घाटे संभाजी नगर मंगरुळपीर यांची भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड भारत सरकार कंपनी मध्ये मॅनेजमेंट ट्रैनी ऑफीसर ग्रेर्ड-१ या पदावर नियुक्ती झाली असून त्यांची चिकाटी मेहनत परिश्रम व सोबतच आई-वडिलांचा आशीर्वाद ज्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव मदत केली यामुळेच यश संपादन करून नाथ नगरीच्या सुपूत्राने मंगरूळपीर च्या शिरपेचा रोवला मानाचा तुरा सुमित याचे नाथ नगरीमध्ये व परिसरामध्ये



अभिनंदन होत असून शुभेच्छा चा वर्षाव सुद्धा होत आहे त्यांना पुढील वाटचालीस भरभरून मित्रपरिवार चहातयांनी शुभेच्छा दिल्या .बळीराजा प्रकल्पग्रस्त संघटनेचे श्री व सौ भरदुक यांनी त्यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन सन्मान केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## बांधकाम कामगार विभागाच्या बेजबाबदार पणामुळे मजुराचे हाल!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

वाशिम जिल्ह्यातील अनसिंग येथील प्रकार शासनाने कामगार विभाग यांच्या पोर्टलवर जनरेट केलेल्या पावती नुसार बांधकाम कामगार यांना दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी अनसिंग येथे उपस्थित राहून त्यांच्या साहित्याचे वाटप करण्यात येणार या अशाने जिल्ह्यातील बांधकाम कामगार हे अनसिंग येथे केवायसी करिता बांधकाम कामगार यांच्या ऑफिसमध्ये गेले असता सदर ऑफिसला कुलूप लावलेले दिसले.

त्यामुळे कामगारांचा विनाकारण पायपीट झाली आणि त्यांची मजुरी सुद्धा बुडाले शासनाच्या या बेजबाबदारपणामुळे ग्रामीण भागातील व शहरी भागातील कामगारांचे विनाकारण हाल होत आहेत तरी संबंधित वरिष्ठ यंत्रणेने याकडे लक्ष देऊन बांधकाम कामगार


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बांधकाम कामगारांच्या भांडी संच वाटपातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर!
*दलालांचे साखळी गैरप्रकार व मजुरांची उघड लूट
* दोषी अधिकारी व संबंधितावर गुन्हे दाखल करा - बालाजी मोरे



मजुरांना न्याय द्यावा. अशी मागणी बांधकाम कामगार लाभार्थी यांच्याकडून करण्यात येत आहे.

## साखरडोह येथील मस्टर घोटाळ्याची चौकशी प्रलंबित

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मानोरा तालुक्यातील साखरडोह येथे घरकुल योजना, सिंचन विहीर तसेच जलतारा अभियानांतर्गत मस्टर मध्ये मोठ्या गैरप्रकार झाला असून याची सखोल चौकशी व्हावी अशी ग्रामस्थांनी मागणी केला असून, या अगोदर वारंवार याची तक्रारी करून ही संबंधित प्रशासकीय अधिकारी चौकशीसाठी पुढे येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

राज्य व केंद्र शासनाच्या आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी मंजूर निधी त्यांच्या खात्यात जमा करण्यात आला. अनेक लाभार्थ्यांनी शासनाच्या निकषांनुसार घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे. मात्र मस्टरच्या माध्यमातून मिळणारी सुमारे २६.५०तून रुपयांची रक्कम अद्यापही त्यांना मिळालेली नाही. तक्रारही त्यांना मते लाभार्थ्यांनी त्यांच्या नातेवाईक व मित्रमंडळींची जॉबकार्ड व बँक खात्याची माहिती जॉब कार्डजगार सेवक काकडे यांना दिली होती. मात्र ही नावे वगळून संबंधितांनी आपल्या मर्जीतील लोकांच्या खात्यावर रक्कम जमा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे गरीब लाभार्थ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे तोंडी तक्रारी देऊन ही कोणतीही दखल घेण्यात



आली नाही. त्यामुळे नागरिकांनी दि. १८ सप्टेंबर २०२५ पंचायत समिती मानोरा येथील गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन दिले. पुढे ५ जानेवारी २०२६ रोजी विभागीय आयुक्त, दरम्यान, कारंजा पंचायत समिती अंतर्गत यावर ही गावातील अशाच प्रकारच्या प्रकरणात संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी चौकशी करून ग्राम रोजगार सेवकाला निलंबित केठे होते. त्यामुळे साखर डोह येथील प्रकरणाकडे मात्र दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. यावरडी येथील मस्टर घोटाळ्याबाबतची बातमी २८ मार्च रोजी 'देशोचती' वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती. साखर डोह येथील मस्टर गैरप्रकाराबाबत यापूर्वीही विविध वृत्तपत्रां मध्ये बातम्या प्रकाशित झाल्या असतानाही प्रशासनाने डोळेझाक केल्याचा आरोप होते आहे. याशिवाय. जलतारा अभियानांतर्गत शेतकऱ्यांनी शेतात खड्डे खोदण्याचे काम केले होते. मात्र त्या कामांच्या मोबदल्याच्या रक्कमा अद्याप मिळालेल्या नाहीत. याबाबत शेतकरी बळवंत भगत, मीराबाई बेलखडे, सुशिलाबाई पखाले व रंजनाबाई भगत यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी दिल्या आहेत. सदर सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून घरकुल, सिंचन विहीर व जलतारा मस्टरमधील गैरप्रकार उघड करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदार नागरिकांकडून करण्यात आली आहे.

## गंगापूर गावातून जाणारी...
# अवैध गौण खनिज वाहतूक तात्काळ बंद करा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### गोरसेनेचा आंदोलनाचा इशारा

कारंजा तालुक्यातील गंगापूर गावातील ग्रामस्थांसह गोरसेनेने गावातून अवैधरित्या होत असलेली गौण खनिज वाहतूक तात्काळ बंद करण्याची मागणी नुकतीच जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. गोरसेनेचे कारंजा तालुकाध्यक्ष शेषराव जानूसिंग चव्हाण यांच्यासह गंगापूर गावातील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गंगापूर गावातून अवैधरित्या गौण खनिज वाहतूक करणाऱ्या जड वाहनांमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात हानी होत असून, या वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे ग्रामस्थांना प्रचंड त्रास होत आहे.

गावालगत असलेल्या गिट्टी खदानमधून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असून ही जड वाहने थेट गावाच्या मध्यवर्ती भागातून जातात.





परिणामी रस्त्यांची दुरवस्था झाली असून अनेक ठिकाणी रस्ते खड्डेमय झाले आहेत. इतकेच नव्हे तर जड वाहनांच्या कंपनामुळे रस्त्यालगतच्या घरांच्या भिंतींना तडे गेल्याचेही ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे.या गंभीर समस्येबाबत ग्रामस्थांनी यापूर्वी तीन वेळा तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊनही प्रशासनाने ठोस पावले उचलली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. कारंजा येथील आमदार सईताई डहाके यांनाही निवेदन दिले आहे. मात्र या तक्रारीबाबत कार्यवाही होत नसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.याशिवाय, गंगापूर गावाला मागील तीन वर्षांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही अत्यंत गंभीर बनला आहे.

या समस्येचे तातडीने निराकरण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.ग्रामस्थांनी प्रशासनाकडे गावातून जाणारी जड वाहतूक तात्काळ बंद करण्यासोबतच खराब झालेले रस्ते तातडीने दुरुस्त करण्याची आणि पाणीटंचाईचा प्रश्न सोडवण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः गावाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशीही विनंती करण्यात आली आहे.दरम्यान, प्रशासन या गंभीर प्रश्नांकडे कितपत गांभीर्याने लक्ष देऊन उपाययोजना करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### पोलीस म्हणतात गावातून जड वाहने जाऊ द्या !

गंगापूर गावातून जाणाऱ्या जड वाहनांच्या गौण खनिज वाहतुकीमुळे गावकऱ्यांना अतोनात त्रास होत असताना पोलिसांनी मात्र, ही जड वाहतूक गावातूनच जाणार, गावकऱ्यांनी ही वाहने गावातून जाऊ द्यावीत, अशी भूमिका घेतल्यामुळे या बिट मधील पोलिसांच्या भूमिकेबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची महसूल प्रशासनाची जबाबदारी असताना पोलीस प्रशासनाने येथे हस्तक्षेप करण्याची गरज नसतानाही संबंधित पोलीस कर्मचारी गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर एवढे मेहरबान का? याची चर्चा परिसरात होत आहे. याकडे पोलीस अधीक्षकांनी लक्ष देण्याची गरज आहे.


## रानडुकराचा हल्ला; शेतकरी गंभीर जखमी

### वनविभागाचे दुर्लक्ष खंडाळा शिंदे परीसरात भीतीचे वातावरण

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

मालेगाव तालुक्यातील शिरपूरजवळील खंडाळा शिंदे येथे रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाच्या दुर्लक्षावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामचंद्र शिंदे (वय ३७ वर्षे) हे आपल्या शेतात गुरांच्या चाऱ्यासाठी टाकलेल्या दादरीतील बाजरी पिकाला पाणी देण्यासाठी काल सकाळी गेले होते. त्याच वेळी दादरीत लपून बसलेल्या रानडुकराने अचानक त्यांच्या अंगावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांना जोरदार धडक बसून ते गंभीर जखमी झाले. शिंदे हे कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवर करणारे शेतकरी असून त्यांच्या शेतात गुरांसाठी चारा म्हणून दादर टाकलेले आहे. मात्र, परिसरात



वाढलेल्या रानडुकर व रोही यांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान होत असून त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे.

**वनविभागावर निष्काळजीपणाचा आरोप**

गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अशा घटना वारंवार घडत असतानाही वनविभागाने याकडे दुर्लक्ष केले असून, जखमी शेतकऱ्याची साधी भेट घेण्याचीही तसदी घेतलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.खंडाळा शिंदे परिसरात रानडुकर व रोही यांचा तातडीने बंदोबस्त करावा, तसेच जखमी शेतकरी रामचंद्र शिंदे यांना त्वरित आर्थिक मदत (भरपाई) द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिगाव प्रकल्पाचे पाईप आगीत भस्मसात



प्रतिनिधी २७ एप्रिल

**खामगाव:** जलंब रोडवर एका गोदामात ठेवलेल्या जिगाव प्रकल्पाच्या पाईपला भीषण आग लागली. त्यामुळे पाईप मोठ्या प्रमाणात जळाले. आगीचे लोळ दुरून दिसत होते. आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू होते. जवळपासच्या भागातील अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. तसेच जवानांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. परंतु आगीची तीव्रता इतकी भीषण होती त्यामुळे आग विझवण्यात अडचण येत होती.

खामगांव, शेगांव, जळगांव जामोद येथील अग्निशमन दलाच्या जवानांनी आग विजवण्या करिता प्रयत्न केले.पिव्हीसी पाईप जळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, कोणतीही जिवित हानी झाली नाही. आग नेमकी कशामुळे लागली हे कळू शकले नाही.

# भंगार साहित्याच्या गोदामाला आग ; अग्निशमन दलाच्या तत्परतेने अनर्थ टळला !

प्रतिनिधी २७ एप्रिल

**♦ साहित्य जळून खाक झाल्याने आर्थिक नुकसान**



**खामगाव :** शेगाव रोडवरील एका शाळेच्या मागे असलेल्या भंगार साहित्याच्या गोदामाला रविवारी (दि. २६) दुपारी अचानक आग लागली. या आगीत मोठ्या प्रमाणावर भंगार साहित्य जळून खाक झाले असून, मोठ्या आर्थिक नुकसानाची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील भंगार व्यापारी सत्येंद्र सोनोने यांचे शेगाव रोड परिसरात गोदाम असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भंगार साहित्य साठवून ठेवण्यात आले होते. काही साहित्य उघड्यावरही ठेवण्यात आले होते. दुपारच्या सुमारास अचानक या साहित्याला आग लागली. घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या चार गाड्यांनी शर्थीचे प्रयत्न करून काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविले. त्यामुळे संभाव्य मोठी हानी टळली असली, तरी गोदामामधील बहुतांश भंगार साहित्य जळून खाक झाले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

भंगार गोडाऊनला लागलेल्या आगीचा फटका शेजारील शाळेलाही बसला आहे. आगीच्या झळांमुळे शाळेच्या मागील भिंतीचे काही प्रमाणात नुकसान झाले असून, भिंतीवर बसवलेले पाण्याचे पाईपही जळाले आहेत. घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# बुलढाण्याचा पारा 43.5 अंशावर !

**♦ विदर्भातील अकरा शहरांच्या तुलनेत सर्वात कमी तापमान**

प्रतिनिधी २७ एप्रिल



**बुलढाणा :** थंड हवेसाठी ओळख असलेल्या बुलढाण्याने यंदाच्या उन्हाळ्यात उष्णतेचा तीव्र फटका अनुभवला असून, रविवारी ४३.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. विदर्भातील सर्वाधिक तापमानाच्या तुलनेत बुलढाण्याचे तापमान थोडे कमी असले, तरी उष्णतेची तीव्रता अधिक होती. रविवार असतानाही दुपारच्या सुमारास शहरातील रस्त्यावर शुकशुकाट दिसून आला.

अकोला (४६.९) आणि अमरावती (४६.८) ही शहरे सर्वाधिक उष्ण ठरली, तर भंडारा (४४) आणि ब्रह्मपुरी (४४.२) यांनीही चाळीशी ओलांडत उष्णतेचा तडाखा कायम ठेवला. चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये ही बुलढाण्यापेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली आहे. बुलढाण्यासारख्या तुलनेने थंड हवामानासाठी प्रसिद्ध असलेल्या शहरात एवढ्या उच्च तापमानाची नोंद होणे चिंताजनक मानली जात आहे. गेल्या काही वर्षात तापमानात सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र असून, हवामान बदल, वेगाने वाढणारे शहरीकरण, हरितक्षेत्रातील घट आणि पाण्याचे कमी होत चाललेले स्त्रोत ही प्रमुख कारणे पुढे येत आहेत.उष्णतेच्या लाटेमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत असून, नागरिकांनी अत्यावश्यक कामांशिवाय बाहेर पडणे टाळले आहे. शेतकरी, बांधकाम मजूर आणि रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांना या उन्हाचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्माघाताच्या घटनांची शक्यता लक्षात घेता आरोग्य विभागानेही सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# छिन्नविछिन्न अवस्थेत महिलेचा मृतदेह आढळला!

## शिर व धड वेगवेगळ्या ठिकाणी: खुनाचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी २७ एप्रिल

**खामगाव:** जळगाव जामोद तालुक्यातील रसूलपूरजवळील राजुरा शिवारात एका महिलेचा मृतदेह छिन्नविच्छिन्न अवस्थेत आढळून आल्याने शनिवारी सकाळी परिसरात खळबळ उडाली. महिलेचे शिर व धड वेगवेगळ्या ठिकाणी आढळून आले असून, मृतदेह काही प्रमाणात जळालेल्या अवस्थेत असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून मिळाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना शनिवार, दि.२५ एप्रिल रोजी सकाळी ८:०० वाजेच्या सुमारास उघडकीस आली. नागरिकांना सर्वप्रथम शिवारात शिर दिसून आले. याबाबत माहिती मिळताच जळगाव जामोद पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर परिसरात शोधमोहीम राबविल्यानंतर काही अंतरावर महिलेचे धडही आढळून आले. घटनेची माहिती मिळताच बुलढाणा येथून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अमरावती येथील फॉरेन्सिक पथक, तसेच वाशिम येथील श्वान पथकाला तपासासाठी पाचारण करण्यात आले. फिंगरप्रिंट तज्ज्ञांनीही घटनास्थळी तपास सुरू केला आहे. घटनास्थळी काही महत्त्वाचे पुरावे मिळाले असून, त्यामध्ये हातातील हिरव्या बांगड्या, गळ्यातील माळ (नकली पेंडंटसह), हातातील काळा दोरा, तसेच पायातील सँडल यांचा समावेश आहे. मृत महिला कोण आहे, तिची ओळख काय, मृत्यूचे नेमके कारण काय, तसेच हा प्रकार हत्या आहे की, अन्य कोणती घटना, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असून, नागरिकांना संशयास्पद हालचालींबाबत माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वैद्यकीय परिषदेच्या निवडणुकीत केवळ ८.३९ टक्केच मतदान

**♦ जिल्ह्यातील वैद्यकीय व्यावसायिकांचा निरुत्साह**

प्रतिनिधी २७ एप्रिल

**बुलढाणा :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निवडणुकीत जिल्ह्यात अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने वैद्यकीय व्यावसायिकांचा निरुत्साह स्पष्टपणे समोर आला आहे. २,६३५ नोंदणीकृत मतदार असताना केवळ २२१ जणांनी रविवारी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे मतदानाची टक्केवारी केवळ ८.३९ टक्के इतकीच नोंदली गेली. विशेष म्हणजे, मतदान करणाऱ्यांमध्ये १८३ पुरुष आणि ३८ महिला मतदारांचा समावेश असून, महिलांचा सहभाग अत्यल्प असल्याचेही दिसून आले. चार मतदान केंद्रांवर सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा स्त्री रुग्णालय येथे मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. निवडणुकीचे नियोजन जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले होते. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ नुसार परिषदे मधील नऊ सदस्यांची निवड नोंदणीकृत व नूतनीकरण केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांकडून केली जाते. मात्र, या महत्त्वाच्या प्रक्रियेत इतक्या कमी प्रमाणात मतदान झाल्याने वैद्यकीय क्षेत्रातील उदासीनता अधोरेखित झाली आहे. यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रवीण लिहितकर यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले, तर जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील व डॉ. सागर फाटे यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली

# एससी उपवर्गीकरणावर सकल मातंग समाजाच्या बैठकीत चर्चा

**मातंग समाजाच्या बैठकीमध्ये उपस्थितांनी चर्चा केली. तालुक्यात जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्णय**

प्रतिनिधी २७ एप्रिल

**मलकापूर :** अनुसूचित जातीतील उपवर्गीकरणाच्या विषयावर सकल मातंग समाजाच्या वतीने मलकापूर तालुक्यात बैठक घेण्यात आली. ही बैठक रविवारी (दि. २६) येथील विश्रामगृहात आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण सुरळकर होते. यावेळी उपवर्गीकरणा संदर्भातील विविध सामाजिक मुद्यांवर सविस्तर चर्चा आरक्षणाच्या समाजामध्ये करण्यात आली, तसेच अनुसूचित जातीतील उपवर्गीकरणा बाबत जनजागृती करण्यासाठी तालुक्यातील गावागावांत व वस्त्यांमध्ये भेटी देण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस निवृत्ती तांबे, गणेश क्षीरसागर, नारायण सोनोने, भगवान चंदनशिव, डॉ. प्रल्हाद अवसोरमल, अनंता वाडसे, गोविंदा वानखेडे, तुकाराम कसारे, तुकाराम चंदनशिव, श्रावण हिवाळे, राजू सोनोने, कृष्णा शिरगोळे, विठ्ठल अंभोरे, श्याम जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नांदुऱ्यात कार्यशाळा

प्रतिनिधी २७ एप्रिल

**♦ प्रतिबंधात्मक आरोग्य उपायांवर प्रशासनाचा भर!**

**नांदुरा:** राज्यात १ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पंचायत समिती सभागृहात शनिवारी (दि. २५) कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्नेहा पाटील यांनी भूषविले. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागात प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देऊन संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता व बाल मृत्यूदर घटवणे, तसेच आरोग्य सेवांची गुणवत्ता व उपलब्धता वाढवणे हा आहे. याशिवाय, नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करणे, शासकीय आरोग्य योजनांची १०० टक्के अंमलबजावणी सुनिश्चित करणे आणि गावांना स्वच्छता व आरोग्य निकषांवर प्रोत्साहन देणे यावरही या अभियानात विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. कार्यशाळेत डॉ. स्नेहा पाटील यांनी अभियानाची उद्दिष्टे, अंमलबजावणीची पद्धत आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आकोदे, डॉ. रिंढे डॉ. रोजतकर, आरबीएसकेचे डॉ. किशोर घाटे, डॉ. ज्ञानेश्वर खोद्रे, डॉ. स्मिता गव्हाड, डॉ. उज्ज्वला खिल्लारे, तसेच आरोग्य सहायक गजानन डांगे, लसीकरण पर्यवेक्षक संतोष तायडे, आशा समन्वयक मंगेश खर्चे, कार्यक्रम सहायक संदीप सपकाळ, क्षयरोग पर्यवेक्षक झिशान खान, कुष्ठरोग पर्यवेक्षक शिंदे आदी उपस्थित होते.

# ४४ डिग्री तापमानात टीनपत्र्याच्या खोलीत शिष्यवृत्ती परीक्षा; मलकापूरात शिवसेना (उबाठा) सह पालक संतप्त...

प्रतिनिधी २७ एप्रिल



**मलकापुर:** तालुक्यात गेल्या ४-५ दिवसांपासून प्रचंड उष्णतेची लाट सुरू असताना मलकापूर येथील चौथीच्या विद्यार्थ्यांची शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा तब्बल ४४ अंश तापमानात गोविंद विष्णू महाजन विद्यालयात घेण्यात आली. भर दुपारी लहान विद्यार्थ्यांना टीनपत्र्याच्या खोलीत बसवण्यात आल्याने पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला.याबाबतची माहिती पालकांनी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शहरप्रमुख हरीदास गणबास यांना दिली, अत्यंत उष्ण हवामानात विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व सोयीस्कर , पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे अपेक्षित असताना प्रशासनाकडून योग्य नियोजन न झाल्याचे दिसून आले. इतर जिल्ह्यात उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ होत असतानाही शिक्षण विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करीत शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी शिक्षणाधिकारी फाळके यांची भ्रमणध्वनीद्वारे कान उघाडणी केल्याने फाळके यांनी तात्काळ परीक्षा केंद्रावर धाव घेतली यावेळी उपस्थित पालकांनी शिक्षणिधिकारी फाळके यांच्या अनागोंदी कारभारा विषयी रोष व्यक्त केला आहे.

# रसायनांनी आंबा पिकवाल तर थेट फौजदारी गुन्हाच दाखल होणार !

प्रतिनिधी २७ एप्रिल

**खामगाव :** उन्हाळ्याच्या सुरुवातीपासूनच बाजारात आंबा, केळी, पपई, चिकू आदी फळांची मोठ्या प्रमाणावर आवक वाढू लागते. मागणी वाढताच काही व्यापाऱ्यांकडून फळे लवकर पिकवण्यासाठी घातक रसायनांचा वापर केल्याच्या घटना समोर येतात.

या पार्श्वभूमीवर अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाने कठोर भूमिका घेत कॅल्शियम कार्बाईडसारख्या रसायनांच्या वापरावर पुन्हा एकदा बंदीची सक्ती केली आहे. कॅल्शियम कार्बाईडचा वापर करून फळे पिकवणे हा अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा मानला जातो. आढळल्यास संबंधितांवर थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश राज्यातील अन्न सुरक्षा आयुक्तांना देण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या काळात फळबाजारांवर अधिक बारीक नजर ठेवली जाणार आहे.केळी, पपई, चिकूवरही केमिकल्सचा वापर ! आंब्याबरोबरच केळी, पपई, चिकू आदी फळेही कृत्रिमरीत्या पिकवली जातात. जलद नफा मिळविण्यासाठी काही व्यापारी या फळांवरही रसायनांचा वापर करत असल्याचे निदर्शनास येते.

**प्रकृतीला कोणते धोके ?**

रसायनांनी पिकवलेली फळे खाल्ल्यास डोकेदुखी, चक्कर, मळमळ, उलट्या, पोटदुखी यांसारखे त्रास होऊ शकतात. दीर्घकाळ सेवन केल्यास मज्जासंस्था, श्वसनसंस्था आणि त्वचेवरही परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

**विभागाकडून फळबाजार, गोदामांची तपासणी होणार!**

अन्न सुरक्षा विभागाकडून बाजारपेठा, गोदामे आणि घाऊक विक्रेत्यांच्या ठिकाणी अचानक तपासण्या केल्या जाणार आहेत.

**विक्रेत्यांवर थेट फौजदारी कारवाईचा आदेश**

अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत कॅल्शियम कार्बाईडचा वापर आढळल्यास संबंधित विक्रेते, साठवणूकदार किंवा पुरवठादारांवर थेट फौजदारी गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. दंडासोबतच कारावासाचीही तरतूद आहे.

**या रसायनांचा वापर !**

कॅल्शियम कार्बाईड हे सर्वाधिक वापरले जाणारे रसायन आहे. यापासून निर्माण होणारा ॲसिटिलीन वायू फळे लवकर पिकवतो; मात्र हा वायू आरोग्यासाठी अत्यंत घातक असतो. कॅल्शियम कार्बाईड चा वापर पूर्णपणे बंदिस्त आहे. संशयित फळांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले जातील. दोषी आढळल्यास तत्काळ कारवाई केली जाणार आहे.

# घरगुती गॅसचा गैरवापर रोखणारी पथके निष्क्रिय; जिल्ह्यात काळाबाजार सुरूच !

प्रतिनिधी २७ एप्रिल

**♦ कारवाया थंडावल्याने व्यावसायिक बिनधास्त !**

**खामगाव :** घरगुती गॅस सिलिंडरच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी प्रशासनाने गठित केलेली पथके सध्या निष्क्रिय झाल्याचे चित्र समोर येत आहे. आखाती देशांतील युद्ध परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर ही बाब अधिक गंभीर मानली जात आहे. सुरुवातीच्या काही दिवसांत पथकांकडून कारवाया करण्यात आल्या; मात्र त्यानंतर जिल्हाभरात अशा कारवाया थांबल्याचे दिसून येते. पुरवठा विभागाच्या दुर्लक्षामुळे घरगुती गॅस सिलिंडरचा सर्रास गैरवापर होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. विशेष म्हणजे, व्यावसायिक कारणांसाठी घरगुती सिलिंडरचा उघडपणे वापर होत असल्याचे आढळत आहे.

प्रशासन पुन्हा ॲक्शन मोडमध्ये येणार का?

घरगुती गॅस सिलिंडरच्या गैरवापरा वर नियंत्रण आणण्यासाठी प्रशासनाने पुन्हा पथके सक्रिय करावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. सध्या गैरवापरा च्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने प्रभावी कारवाईची गरज अधोरेखित केली जात आहे. नियमित तपासणी आणि कठोर कारवाई द्वारेच या प्रकारांना आळा बसू शकतो, असे मत व्यक्त होत आहे. घरगुती गॅस सिलिंडरच्या गैरवापरा मुळे सर्वसामान्य ग्राहकांसाठी गॅस उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नियमांचे उल्लंघन करत व्यावसायिक कारणांसाठी घरगुती गॅसचा वापर होत असल्याने पुरवठ्यावर ताण वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकाराची संबंधित विभागाने गांभीर्याने दखल घेऊन नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने तातडीने कारवाई केल्यास गॅसचा गैरवापर रोखता येईल आणि सामान्य ग्राहकांना दिलासा मिळू शकतो. घरगुती सिलिंडरचा वापर मोठी हॉटेल्स, रेस्टॉरंट्स तसेच छोट्या चहाच्या टपऱ्या आणि उपहारगृहांमध्येही घरगुती गॅसचा वापर केला जात असल्याचे दिसते.

# खामगावातील रेल्वे मालधक्क्यावर हमाली व वाहतूक भाडे जुन्याच दराने द्यावे!

प्रतिनिधी २७ एप्रिल

**खामगाव :** रेल्वे मालधक्का येथे ट्रान्सपोर्ट व हँडलिंगचे कंत्राट जळगाव येथील एका कंपनीला देण्यात आले आहे; मात्र कंपनी संचालकांनी पूर्वीप्रमाणे ३,१५० रुपये वाहतूक दर देण्यास नकार देत २,३०० रुपयांप्रमाणे काम करण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप करण्यात येत आहे. संघटनेच्या वतीने कोणत्याही प्रकारे वाढीव दराची मागणी करण्यात आलेली नसून केवळ जुनाच दर कायम ठेवण्याची मागणी करण्यात आली होती. स्थानिक ट्रक मालक व चालकांमध्ये वाढत्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर खामगाव मोटार असोसिएशनने राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांना निवेदन देत सविस्तर चर्चा केली. यावेळी मंत्र्यांनी तत्काळ दखल घेत कंत्राटदाराशी चर्चा करून वाहतूक भाडे व हमालीचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

जात एफसीआय हँडलिंग व ट्रान्सपोर्टशी संबंधित कंपनीकडून स्थानिक ट्रक मालक व चालकांवर कमी दरात काम करण्यासाठी दबाव टाकला असल्याने वाहनधारकां मध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या प्रश्नावर तातडीने तोडगा न निघाल्यास आंदोलनाचा इशारा वाहनधारकांनी दिला आहे.

दरम्यान, या वादामुळे मालवाहतुकीच्या कामकाजावर ही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. कामगार मंत्री ॲड. फुंडकर हे हमाल, ट्रक मालक व चालकांवर उपासमारीची वेळ येऊ देणार नाहीत, असा विश्वास असोसिएशन ने व्यक्त केला आहे. वाहतूक व हमाली संदर्भातील प्रलंबित प्रश्नांवर मंत्री जो निर्णय घेतील, तो मान्य करून त्यानुसार काम करण्यास आपण तयार असल्याचेही संघटनेने स्पष्ट केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# कृषी केंद्रांना कुलूप !


## ♦ शेतकरी संकटात, सरकार सुस्त




प्रतिनिधी २७ एप्रिल

**अकोला :** राज्यातील आणि विशेषतः अकोला जिल्ह्यातील कृषी व्यवसायिकांनी आजपासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. विविध जाचक अटी आणि अन्यायकारक नियमांविरोधात 'अकोला जिल्हा कृषी व्यावसायिक संघाने' आज, सोमवार २७ एप्रिल २०२६ पासून जिल्हाभर कडकडीत बंद पाळण्याचा निर्णय घेतला आहे. खरिपाचा हंगाम तोंडावर असताना कृषी केंद्रे बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांची मोठी कोंडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

'महाराष्ट्र बंद... अकोला जिल्हा बंद!' अशा घोषणा देत कृषी केंद्र चालकांनी आपल्या दुकानांना कुलूप ठोकले आहे. खत कंपन्यांकडून केली जाणारी




अनधिकृत लिंकिंग, इन्स्पेक्टर राजचा पुन्हा सुरू झालेला त्रास आणि सीलबंद निविष्ठा विकल्यानंतरही दुकानदारांना होणारी शिक्षा, यांसारख्या १० प्रमुख मागण्यांसाठी हा लढा पुकारण्यात आला आहे. वारंवार विनंती करूनही सरकार दाद देत नसल्याने शेवटी व्यापाऱ्यांनी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. कीटकनाशक कंपन्यांकडून एक्सपायरी मटेरियल परत न घेणे आणि किरकोळ विक्रेत्यांवर लादलेले नियम यामुळे कृषी व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले आहेत. सॅम्पलचे पैसे मिळण्यापासून ते जाचक 'साथी ॲप'च्या अनिवार्यतेपर्यंत अनेक मुद्द्यांवर हा बंद पुकारण्यात आला आहे. जर सरकारने तातडीने दखल घेतली नाही, तर हा बंद अधिक तीव्र करण्याचा इशारा संघाने दिला आहे.ऐन खरिप पेरणीच्या तोंडावर कृषी केंद्रे बंद राहिल्यास बियाणे आणि खतांसाठी शेतकऱ्यांची मोठी पायपीट होणार आहे. प्रशासन यावर काय तोडगा काढते की हा संप असाच लांबून जिल्ह्याची अर्थव्यवस्था ठप्प होते, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरेल.

# अकोल्याचा 'सूर्य' कोपला ! ज्वाळांनी शहर बनले भट्टी

## ♦ प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कुंभकर्णी झोपेत!
## ♦ महाराष्ट्रातील सर्वाधिक तापमान अमरावती व अकोल्यात
## ♦ लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे अकोल्याची अवस्था बिकट




प्रतिनिधी २७ एप्रिल

**अकोला :** विदर्भाचा 'कॉटन सिटी' समजल्या जाणाऱ्या अकोल्यात सध्या आभाळातून आग ओकली जात आहे. महाराष्ट्रातील सर्वात उष्ण शहर म्हणून अकोल्याची नोंद झाली असून, पारा चक्क ४७ अंशांच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. मात्र, दुर्दैवाची बाब अशी की, जनता उन्हात होरपळत असताना शहराचे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत.



अकोलेकरांना या आगीतून वाचवण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात हे सर्वजण सपशेल नापास ठरले आहेत. अकोल्यात जणू सुर्याचा प्रकोप सुरू झाला आहे. रविवारी शहरात ४६.९ अंश सेल्सिअस तापमानाची विक्रमी नोंद झाली. गेल्या २४ तासांत पाऱ्यात १.३ अंशांची मोठी वाढ झाली असून, अकोलेकरांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. मे महिन्याच्या उन्हाची झळ एप्रिलमध्येच बसत असल्याने रस्ते ओस पडले आहेत, पण थंड पाण्याचे पाणपोई किंवा सावलीसाठी प्रशासनाने कोणतेही नियोजन केलेले नाही.

अकोला 'हॉट सिटी' म्हणून ओळखले जात असताना, लोकप्रतिनिधी फक्त निवडणुकांच्या गणितात व्यस्त आहेत का? असा संतप्त सवाल जनता विचारत आहे. झाडांची कत्तल आणि नियोजनाचा अभाव यामुळे अकोला जणू भट्टी बनले आहे. नागरिकांना आपल्या आरोग्याची काळजी स्वतःच घ्यावी लागत आहे, कारण प्रशासनाच्या लेखी सामान्य माणसाच्या जीवापेक्षा कागदी घोडे नाचवणे जास्त महत्त्वाचे ठरत आहे. जर एप्रिलमध्येच ही अवस्था असेल, तर मे महिन्यात अकोल्याचे काय होणार? हा विचार करूनच अकोलेकरांच्या अंगाचा थरकाप उडत आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का? की जनतेला असेच मरणाच्या दारात सोडून दिले जाणार?



# सोनटक्के प्लॉटचा मुख्य रस्ता महिनाभरापासून बंद

## ♦ नागरी सुविधांचा अभाव असल्याची ओरड

प्रतिनिधी २७ एप्रिल



**अकोला :** प्रभाग १७ मधील सोनटक्के प्लॉट परिसरातील नागरिक गेल्या महिनाभरापासून गंभीर समस्यांचा सामना करत आहेत. या भागातील मुख्य रस्ता बंद, पाईप लाईन फुटली तसेच नागरी सुविधांच्या अभावामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

मुख्य रस्त्याची समस्या असताना जुनी पाण्याची पाइपलाइन फुटल्यामुळे भीषण उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. दोन गंभीर समस्यांमुळे लोक हैराण झाले आहेत. वाहतुकीची कोंडांडी: मुख्य रस्ता बंद असल्यामुळे नागरिकांना आपली वाहने हरिहरपेठ मार्गे वळसा घालून न्यावी लागत आहेत. यामुळे वेळेचा आणि इंधनाचा अपव्यय होत आहे.

रस्ता बंद असल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका आत येऊ शकत नाही. जर कोणी आजारी पडले, तर त्यांना दवाखान्यात नेणे कठीण झाले आहे. वॉर्डमध्ये नियमित स्वच्छता होत नसल्याने कचऱ्याचे ढीग साचले असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन रस्त्याचे काम पूर्ण करावे आणि रस्ता वाहतुकीसाठी लवकरात लवकर खुला करावा अशी मागणी आहे.

# उड्डाणपुलाचे श्रेय कसले घेता, पूल आधी पूर्ण तर करा

## ♦ बिर्ला रेल्वे गेट पुलाचे श्रेय लाटण्यावरून नागरिकांत नाराजी

प्रतिनिधी २७ एप्रिल

**अकोला :** एखाद्या कामाचे श्रेय जरूर घ्या परंतु काम अद्याप पूर्ण झाले नाही. ९ वर्षापासून बिर्ला रेल्वे गेट उड्डाणपुलाचे काम रखडले आहे. आता या कामाचे श्रेय लाटण्यावरून राजकीय पक्षात स्पर्धा दिसते. निधी उपलब्ध झाल्या वरून देखील राजकारण केले जाते आहे. मात्र लोकांना उड्डाणपुल पूर्ण झालेला हवा आहे. फालतू गोष्टी मध्ये त्यांना रस नाही.

उड्डाणपूल ९ वर्षे झाली तरी पूर्ण झाला नाही. आणखी किती वेळ लागणार असा नागरीकांचा सवाल आहे. तसेच श्रेय कसले लाटता आधी काम तर पूर्ण होऊ द्या असे नागरिक बोलत आहेत. या प्रकल्पाची किंमत आता दुप्पट झाली आहे. आणि अजूनही पुलाचा जनतेला उपयोग झाला नाही. त्यामुळे श्रेया मागे न लागता राहिलेले काम किती गतीने पूर्ण करून घेता येईल यासाठी शक्ती खर्च झाली तर अधिक फायद्याचे ठरेल अशी जन भावना आहे.

# जुने शहरातील भाजी बाजारात भीषण आग

## ♦ व्यापाऱ्यांचे आगीमुळे आर्थिक नुकसान

प्रतिनिधी २७ एप्रिल

**अकोला :** जुनेशहर हद्दीतील भाजी बाजारात रविवारी दुपारच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागून एकच खळबळ उडाली. या आगीने काही क्षणांतच उग्र रूप धारण केले आणि जवळ ठेवलेल्या गॅस सिलेंडरनेही पेट घेतल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली. मात्र, स्थानिक नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे जीवित व वित्तहानी टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, भाजी बाजारातील एका दुकानात विद्युत वायरिंगमध्ये बिघाड झाल्याने शॉर्ट सर्किट झाले. त्यातून ठिणगी पडून दुकानातील ज्वलनशील वस्तूंना आग लागली. काही वेळातच आग शेजारील दुकानांकडे पसरू लागली. याच दरम्यान एका सिलेंडरनेही पेट घेतल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले. परिसरात मोठ्या प्रमाणावर धूर पसरल्याने नागरिकांमध्ये घबराट उडाली.

लागलेल्या आगीमुळे सिलिंडरने पेट घेतला होता. नागरिकांच्या सतर्कतेने मोठा अनर्थ टळला. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, काही दुकानांतील साहित्य जळून खाक झाले असून व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार, नुकसानाची रक्कम लक्षणीय असल्याचे सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. पाण्याच्या बादल्या, वाळू आणि उपलब्ध साधनसामग्रीच्या मदतीने त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या धाडसामुळे आग आणखी पसरू शकली नाही. दरम्यान, काही नागरिकांनी तत्काळ दमकल विभागाला कळवल सूचना मिळताच अग्नीशमन विभागाने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी परिस्थितीचा आढावा घेत तातडीने आग विझवण्या काम हाती घेतले. सिलेंडरमुळे वाढलेला धोका लक्षात घेऊन विशेष खबरदारी घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. काही काळाच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेमुळे भाजी बाजार परिसरात अग्नीशमन विभागाने घटनास्थळी पोहोचून आग नियंत्रणात ठेवली. नागरिकांनी दाखवलेल्या धैर्य व तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. योग्य वेळी केलेल्या प्रयत्नांमुळे मोठा अनर्थ टळल्याचे प्रशासनानेही मान्य केले आहे.

# लिनेस क्लबच्या वतीने संस्कार आणि सेवेचा अपूर्व संगम





प्रतिनिधी २७ एप्रिल

**अकोला :** रामदासपेठ येथील कॅस पर्ल किडझ स्कूल मध्ये 'बाल संस्कार शिबिरा'चे दिमाखदार आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शिक्षणासोबतच नैतिक मूल्यांची पेरणी करण्यात आली.

लि. भारतीजी खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी केवळ संस्कारच आत्मसात केले नाहीत, तर मुक्या पक्ष्यांची तहान भागवण्याचा पुण्य संकल्प करून आपल्या संवेदनशीलतेचा परिचय दिला. 'चित्रकला स्पर्धे'च्या माध्यमातून मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला. उत्कृष्ट कलाकृतींचा गौरव करण्यात आला आणि प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. स्तोत्र पठण, गायत्री मंत्र आणि देशभक्तीपर गीतांनी शाळेचे प्रांगण भक्ती आणि अभिमानाने दुमदुमून गेले. पात्र विद्यार्थ्यांना 'शालेय उपयोगी किट'चेही वाटप करण्यात आले. प्लास्टिक निर्मूलनाच्या संकल्पासह आतापर्यंत ८०० पिशव्यांचे वाटप करण्यात आले आहे. सर्वांची साथ लाभल्यास १००० पिशव्यांचे लक्ष्य गाठणे आता कठीण नाही. लि. भादुका जी यांनी दिलेल्या चॉकलेट्ससह एका लहान विद्यार्थ्याचा वाढदिवस साजरा करण्यात आला, ज्यामुळे या कार्यक्रमात अधिकच गोडवा निर्माण झाला. हा प्रकल्प म्हणजे संस्कारांची अशी एक सरिता आहे, जी मुलांना एक जबाबदार नागरिक आणि निसर्गप्रेमी बनवण्याच्या दिशेने मार्गस्थ करत आहे. या उपक्रमांतर्गत क्लबच्या वतीने १७ भेटवस्तू देण्यात आल्या. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी लि. सुलेखा गुप्ता जी यांची देखील प्रमुख उपस्थिती होती.


# अकोट वारखेड रस्त्यामुळे शेतरस्ता बंद

प्रतिनिधी २७ एप्रिल

**हिवरखेड :** सध्या वणी रंभापूर ते वारखेड राज्य महामार्गाचे काम जलद गतीने सुरु आहे. पण या रस्त्याच्या वाढलेल्या उंचीमुळे काही शेतकऱ्यांचा शेतरस्ताच बंद झाल्यामुळे शेतीची मशागत कशी करावी? शेतातून शेतमालाची ने-आण कशी करावी हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा झालेला आहे. हिवरखेड - सौन्दळा रोडवर गोपाल राठी यांच्या शेताजवळ अनेक शेतकऱ्यांचा शेतरस्ता होता पण त्या ठिकाणी रोडची उंची आठ फूट वाढल्याने त्या ठिकाणाहून पायी सुद्धा खाली उतरणे अशक्य झाले आहे. काही शेतकऱ्यांची केळी तोडणीवर आली असून रस्ताच नसल्याने शेताबाहेर केळी कशी काढावी ही त्यांची समस्या आहे. त्या परिसरातील शेतांना इतर कुठलाही रस्ता नाही त्यामुळे शेतकऱ्यांची मशागत सुद्धा खुंटलेली आहे. संबंधित अधिकारी व आमदार प्रकाशभाऊ भारसाकळे यांना निवेदन देऊन सुद्धा ही समस्या सुटली नाही. रस्त्याचे काम पाहणारे संबंधित अधिकारी फोन सुद्धा उचलत नाहीत. आमचा रस्ता जर आठ दिवसाच्या आत करून देण्यात आला नाही तर आम्ही रस्त्याचे काम बंद पाडू असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. निवेदनावर सुरेश कराळे, ज्ञानदेव राऊत, रोमील भगत, अभिजित कराळे, राजाराम कसुरकार, उत्तमराव वाकोडे, मोईन अली, शांताबाई कराळे इत्यादी शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# अडगाव बु. मध्ये पुन्हा गुटखा माफिये सक्रीय



प्रतिनिधी २७ एप्रिल

**हिवरखेड :** हिवरखेड परिसरात गेल्या काही दिवसांपासून गुटखा माफियांनी डोके वर काढलेले दिसते. मध्यप्रदेशातून या भागात गुटखा तस्करी सुरु असल्याची दाट शक्यता आहे. युवकांना व्यसनाधिन करणाऱ्या गुटखा तसेच अन्य अमली पदार्थांवर बंदी आणणे गरजेचे आहे.

# जीवघेण्या उन्हाचा मंदिरावरही परिणाम, दिवसा भक्तांची गर्दी कमी

प्रतिनिधी २७ एप्रिल




**अकोला :** शहरासोबतच जिल्ह्यातही मागील तीन दिवसांपासून तापमान ४६ डिग्री च्या वर पोहोचले आहे जिल्ह्यात असलेल्या उष्णतेमुळे आणि कडक उन्हामुळे लोकांचे जीवन कठीण झाले असून, याचा धार्मिक कार्यांवरही परिणाम झाला आहे. जीवघेण्या उन्हामुळे सकाळी ११ नंतर मंदिरातील गर्दी सुद्धा कमी होत आहे. वाढत्या तापमानामुळे सायंकाळी ७ नंतरच मंदिरांमध्ये भाविक दिसतात. शहरातील बागेतील देवी मंदिरात गेल्या चार दिवसांपासून भाविकांची संख्या कमी झाल्याची माहिती येथील पुजाऱ्यांनी दिली. त्यांच्या मते, उष्णतेच्या तीव्रतेमुळे भाविक सकाळीच दर्शन उरकून घेत आहेत. परंतु सकाळी १०.३० ते ११ नंतर भाविकांचे आगमन पूर्णपणे थांबते. काही पुजाऱ्यांनी सांगितले की, उष्णतेमुळे दर्शनाच्या वेळांवर काही प्रमाणात परिणाम झाला आहे. अनेक मंदिरे दुपारच्या वेळी आपले गर्भगृह बंद ठेवत आहेत किंवा मर्यादित दर्शन देत आहेत. भाविकही आपल्या आरोग्याची काळजी घेत सकाळी आणि संध्याकाळी मंदिरात जात आहेत.

### रात्रीच्या आरतीच्या वेळी भाविकांची मंदिरात गर्दी

शहरातील प्रसिद्ध राजेश्वर मंदिर, सालासर बालाजी मंदिरात पहाटे आरतीसाठी गर्दी दिसून येते आरतीनंतर भाविक दर्शनासाठी येतात. दुपारी मंदिर बंद केले जाते आणि संध्याकाळी पुन्हा उघडले जाते. रात्रीची आरती रात्री ८:३० वाजता होते आणि दिवसाच्या तुलनेत या आरतीला जास्त भाविक उपस्थित असतात. गेल्या चार दिवसांपासून शहरातील अन्य मंदिरातही अशीच परिस्थिती दिसून येत आहे.



# पोलिस व आरोग्य विभागा तर्फे बाळ काळणेंचा सत्कार

प्रतिनिधी २७ एप्रिल



**अकोला :** २६ रोजी रक्ताचे नाते गृप तर्फे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. हया कार्यक्रमात डॉक्टर्स व समाज सेवकांच्या सेवेला प्रोत्साहित करण्यासाठी त्यांचा शिव सम्मान पुरस्काराने सम्मान झाला. सर्पमित्र तथा मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणेंना पुस्कार देवुन पोलिस विभाग व आरोग्य विभागाने त्यांना सम्मानित केले . पोलिस विभागाने जिल्हासाठी नेहमीच साप व वन्य जिवासाठी धडपडणारे बाळ काळणे यांची धाडसी सेवा आहे म्हणून पोलिस उपनिरिक्षक अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत रेडडी व पोलिस निरिक्षक गजानन पडघन यांनी पुरस्कारित केले .कॅन्सरवर मात करून कॅन्सर वर संपूर्ण महाराष्ट्रात कॅन्सर जन जागृति बद्दल जिल्हा शल्य चिकित्सक सौ आरती कुलवाल यांनी आरोग्य सेवे बद्दल गौरवोउदगार काढले. कॅन्सरमुळे ७९३ दिव्यांग झाल्यावरही सर्व समाज सेवा अविरत पणे करित आहे. हयाच असामान्य कामगिरीमुळे हया दोन्ही विभागाने त्यांचे कौतुक केले. कार्यक्रम आयोजक विजय गावंडे यांचा सामाजिक कार्याचा असा पायंडा घेवुन समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न असतो .

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK